रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३४०
www.ramprahar.com

शुक्रवार, २७ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

पोलीस अधिकारी, अंमलदारांना राष्ट्रपती पदक प्रदान/२
खात्यात बोनस जमा झाल्याने बळीराजा सुखावला/५
पुन्हा एकदा भारत-पाक महामुकाबला रंगणार/८

## इतिहास घडला! शुभांशु शुक्ला अंतराळात दाखल



**नवी दिल्ली** : भारतीय अंतराळवीर, ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांनी ड्रॅगन अंतराळयानातून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक गाठले आहे. भारताच्या अंतराळ कार्यक्रमासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल असून शुभांशू आता १४ दिवस अवकाशात संशोधन करणार आहेत. स्क्वाड्रन लीडर राकेश शर्मा यांनी ४१ वर्षांपूर्वी (१९८४मध्ये) अवकाशात तिरंगा फडकवला होता. त्यानंतर आता ४१ वर्षांनी पुन्हा एकदा भारताचा सुपुत्र अंतराळात पोहचला आहे. शुभम आणि त्याच्या चार सहकाऱ्यांनी अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाच्या फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून अक्सिऑम-४ या मोहिमेंतर्गत अंतराळ स्थानकाच्या दिशेने उड्डाण केले होते. २८ तासांच्या रोमांचक प्रवासानंतर हे अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहचले. ही टीम तेथे विविध वैज्ञानिक प्रयोग करेल.

### रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विभागांचा आढावा

# अलर्ट मोडवर काम करा

### राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे निर्देश

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य व केंद्र शासनामार्फत विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आह. या सर्व योजनांचा तत्परतेने लाभ देण्यासाठी तसेच जनतेचे प्रश्न गांभीर्याने सोडविण्यासाठी सर्व यंत्रणांनी अलर्ट मोडवर काम करावे, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिले.



राज्यमंत्री बोर्डीकर यांनी गुरुवारी (दि. २६) रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीत सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, ऊर्जा, महिला व बालविकास तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांचा सविस्तर आढावा घेतला. त्या वेळी त्या बोलत होत्या. प्रत्येक विभागाच्या अधिकाऱ्याने जनतेच्या प्रश्नाची गांभीर्याने व तत्परतेने दखल घेऊन ते प्रश्न मार्गी लावावेत, असे त्यांनी सांगितले.

या बैठकीस खासदार धैर्यशील पाटील, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके, माजी आमदार पंडित पाटील, भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, उपाध्यक्ष वैकुंठ पाटील आदींसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या वेळी रायगड जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांचे नियोजन व अंमलबजावणी तसेच ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी सुरू असलेल्या योजनांचा आढावा घेण्यात आला. पाणीपुरवठा योजनेची प्रगती आणि उर्वरित गावांमध्ये जलवाहिन्या पोहचवण्याच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्याच्या पाणी प्रश्न, जलजीवन आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आदी विषयावर मंत्रालयात विशेष आढावा बैठक घेण्यात येईल, असे राज्यमंत्री बोर्डीकर यांनी जाहीर केले.

सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आरोग्य विभागातील रिक्त पदभरती प्रक्रिया तातडीने करावी. आरोग्याच्या सुविधा आणि योजना १०० टक्के राबविल्या जातील याकडेही लक्ष द्यावे, असे त्यांनी सूचित केले. त्याचप्रमाणे वीज वितरणविषयक तक्रारींचे तत्काळ निराकरण करावे. अखंडित वीजपुरवठा सुरु ठेवण्यासाठी सर्वांनी नेहमी दक्ष रहावे. भूमिगत वायरिंगचे काम पूर्ण झाले असल्यास ओव्हरहेड वायरिंग हटविण्यात यावेत. अनेक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर वारंवार बदलावे लागतात त्याची कारणमिमांसा करून उपाययोजना करावी. सेवा सप्ताह अंतर्गत जी धोकादायक क्षेत्र निश्चित केली आहेत त्या ठिकाणी तातडीच्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचना दिल्या.

प्रारंभी संबंधित विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती सादर केली. जिल्ह्याच्या विकासासाठी प्रशासन दक्ष असून विविध योजनांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी सांगितले.

## नागोठणे-वरवठणे पूल वाहतुकीसाठी बंद

**रायगड : रामप्रहर वृत्त**

नागोठणे येथील रामंमा क्र. १७ ते नागोठणे फाटा-एसटी बसस्थानक-प्राथमिक आरोग्य केंद्र प्रजिमा-४९ या रस्त्यावर असलेला मोघलकालीन पूल अरूंद व कमकुवत झाला आहे. त्यामुळे अपघाताचा धोका लक्षात घेऊन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी या पुलावरील वाहतूक पुढील आदेशापर्यंत पूर्णतः बंद करण्याचे आदेश जारी केले आहेत.

या संदर्भात महाड सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल सादर केला होता. पुलाच्या दोन्ही बाजूस बॅरिकेड्स आणि सूचना फलकही लावण्यात आले आहेत. येथून वाहतूक बंद करण्यात आल्याने नागरिकांसाठी वरवठणे-आंबेघर फाटा-रिलायन्स चौक-नागोठणे हा पर्यायी मार्ग आहे.

## राज्य विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन ३० जूनपासून

**मुंबई : प्रतिनिधी**


महाराष्ट्र विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन ३० जून ते १८ जुलै या कालावधीत मुंबईत होणार असल्याची घोषणा गुरुवारी (दि. २६) विधीमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत करण्यात आली.

विधानभवन येथे आयोजित विधानमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, माहिती तंत्रज्ञानमंत्री ॲड. आशिष शेलार, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभा सदस्य दीपक केसरकर, भास्कर जाधव, नितीन राऊत, जितेंद्र आव्हाड, अमीन पटेल, विधान परिषद सदस्य भाई जगताप, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, श्रीकांत भारतीय व संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत अधिवेशनाच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली. विधीमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांनी कामकाजाची माहिती दिली.



वर्ष २२ वे || ॐ श्री बाळकृष्णाय नमः || स्थापना २००३

## पुण्यतिथी सोहळा



श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)



श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) पिताजी
श्री. चांगू काना ठाकूर



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) माताजी
श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर



श्री समर्थ सद्गुरु दादामहाराज (मुंबई)

आपणांस कळविण्यात येते की, आमचे वडिल स्वानंद सुख निवासी 'श्री. चांगू काना ठाकूर' यांची पुण्यतिथी मिती आषाढ शु. ०२, शके १९४७, शुक्रवार दिनांक २७/०६/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री समर्थ दासबोध वाचन ग्रंथ श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरित्रामृत ग्रंथाचे पारायण प्रारंभ, आषाढ शु. ०३, विनायकी चतुर्थी, शके १९४७, शनिवार दिनांक २८/०६/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता पुण्यतिथी निमीत्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधू भगिनींनी उपस्थित रहावे, ही विनंती.

### कार्यक्रम

**शुक्रवार, दिनांक २७/०६/२०२५**

| | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा)<br>बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर,<br>पखवाज : जयराम म्हात्रे (न्हावा) आत्माराम मोकल |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर), ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज (चिपळूण)<br>श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी), श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी ०२.०० ते ०३.०० भजन | श्री विश्वंभर भजन मंडळ, गव्हाण गायक : हेमंत कोळी,<br>रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ०३.०० ते ०५.०० भजन | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण - कोपर गायीका : श्रीमती. हिराबाई घरत,<br>सौ. आनंदी घरत, सौ. रत्नप्रभा घरत, सौ. चंद्रभागा घरत,<br>श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ - कोपर गायीका : सौ. सुप्रिया घरत<br>वादक : तुषार घरत, टाळकरी - सौ. शितल घरत, कोपर |
| सायं. ०५.०० ते ०६.०० भजन | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर गायीका : पुनम ठाकूर, रूपम वास्कर<br>श्री. हर्षल फडके. पखवाज : श्री. पवन फडके |
| सायं. ०६.०० ते ०७.०० आरती | माऊलींची आरती |
| सायं. ०७.०० ते ०८.०० | एकनाथी भागवत ग्रंथ वाचन / ध्यान |
| सायं. ०८.०० ते ०९.०० भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर बुवा : श्री. वसंतशेठ पाटील<br>पखवाज : गौरव म्हात्रे आणि तुकाराम कोळी |
| सायं. ०९.०० ते ११.०० कीर्तन | विश्ववारकरी सेनेचे महाड तालुका अध्यक्ष मा. ह.भ.प. श्री.शाममहाराज मिरगळ<br>साधकारी मंडळी गायक-ह.भ.प. श्रावण महाराज मिरगळ, ह.भ.प. श्री. प्रमोद<br>महाराज मेस्त्री, ह.भ.प. एकनाथ महाराज मिरगळ |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर (भजन-सार्वजनिक गुरूबंधू भगिनी) |

**शनिवार, दिनांक २८/०६/२०२५**

| | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | नादब्रम्हा भजन मंडळ (रांजणपाडा-खारघर) बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी, वसंतशेठ पाटील (कोपर), ज्ञानेश्वर म्हात्रे (गव्हाण), गणपत ठाकूर (कोपर), भाऊ ठाकूर, (शि.नगर) नितीन ठाकूर (त. पाडा), श्री. महेश पाटील (न्हावा),<br>पखवाज : गौरव म्हात्रे |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) |
| दुपारी १२.०० वाजता | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

*** कार्यक्रमाचे ठिकाण ***
श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण,
ता. पनवेल, जि. रायगड.

*** व्यवस्थापक ***
देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)
शिवाजीनगर- गव्हाण- न्हावेखाडी- कोपर (संचलित)

*** संयोजक ***
श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार)
आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

## निवडक

### उत्तराखंडमध्ये बस नदीत कोसळून तिघांचा मृत्यू, नऊ जण बेपत्ता

**रूद्रप्रयाग** : उत्तराखंडमधील रूद्रप्रयाग जिल्ह्यात बद्रीनाथ घोलतीरजवळ गुरुवारी (दि. २६) सकाळी प्रवाशांनी भरलेली मिनी बस (टेम्पो ट्रॅव्हलर) अलकनंदा नदीत कोसळली. ट्रकने बसला धडक दिल्याने झालेल्या या दुर्घटनेत तीन प्रवाशांचा मृत्यू झाला असून आठ जण गंभीर जखमी झाले आहेत, तर नऊ जण बेपत्ता आहेत. स्थानिक प्रशासनाकडून घटनास्थळी बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. जखमींना नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### 'दुचाकी वाहनांवर टोल आकारणीचा प्रस्ताव नाही'

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने १५ जुलैपासून दुचाकी वाहनांकडून टोल वसून केला जाणार आहे, अशा बातम्या काही प्रसारमाध्यमांत झळकत आहेत. त्यामुळे वाहनचालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, मात्र या केवळ अफवा असून दुचाकीचालकांकडून कोणत्याही प्रकारे टोल घेतला जाणार नाही, असे केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी स्पष्ट केले आहे. सत्य जाणून न घेता दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवू नयेत. मी अशा माध्यमांचा निषेध करतो, असेही ना. गडकरी यांनी म्हटले आहे.

## वीजदर कपातीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार

### भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळींकडून लेखाजाखा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यातील सर्व घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक वीज ग्राहकांसाठी वीज दर कमी केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी आभार व्यक्त केले. राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरू केल्यामुळे साडेसात एचपीपर्यंतचे पंप असलेल्या राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना यापूर्वीच सिंचनासाठी मोफत वीज मिळत आहे, असेही त्यांनी या निमित्ताने सांगितले.

अविनाश कोळी यांनी पुढे सांगितले की, माननीय देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या तीन वर्षात राज्याच्या ऊर्जा विभागाची जबाबदारी पार पाडताना ऊर्जा क्षेत्रात मोठे परिवर्तन घडविले. त्यांच्या नेतृत्वात महावितरण या सरकारी वीज वितरण कंपनीने वीज खरेदी करार करताना रिन्युएबल एनर्जीवर भर दिल्यामुळे कंपनीची वीज खरेदी खर्चात फार मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. याचा लाभ वीज ग्राहकांना करून देण्यासाठी महावितरणने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे सादर केलेल्या वीजदर याचिकेमध्ये इतिहासात प्रथमच वीजदर कमी करण्यास परवानगी मागितली. या याचिकेवर विद्युत नियामक आयोगाने बुधवारी निर्णय दिला असून घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक अशा सर्व ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाचही वर्षात कपात करण्याचा आदेश दिला आहे. यापूर्वी दरवर्षी विजेचे दर वाढत होते. या पार्श्वभूमीवर प्रथमच विजेचे दर कमी होणार असून आगामी पाच वर्षे प्रत्येक वर्षी त्यात घट होणार आहे. (पान २ वर..)

## खानाव-महाळुंगी ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भाजपच्या चंदा वारदे बिनविरोध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील खानाव-महाळुंगी ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची निवडणूक गुरुवारी (दि. २६) झाली. या निवडणुकीत भाजपच्या चंदा निलेश वारदे यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाली आहे. याबद्दल भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनी चंदा वारदे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, एकनाथ देशेकर, अमित देशमुख, सुनील पाटील, नरेश पाटील, नामदेव जमदाडे, रमेश पाटील, बाबू भोईर, संजय तवले, सुनील फराड, गणेश तातरे, आत्माराम पाटील, बळीराम भोईर, हरिश्चंद्र वारदे, विलास भोपी, समीर मुंढे, दीपक तवले, मेघनाथ वारदे, रमेश वारदे, गुरूनाथ पाटील, शशिकांत दिसले, योगेश पाटील, प्रशांत बोलाडे, बाळाराम पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी चंदा वारदे यांचे अभिनंदन करून वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# राज्यपालांच्या हस्ते पोलीस अधिकारी, अंमलदारांना राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान



**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रपतींनी जाहीर केलेली पोलीस शौर्य पदक, उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक तसेच गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदक महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राज्यातील ८३ पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदारांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले. राजभवन येथील दरबार हॉल येथे झालेल्या पदक अलंकरण सोहळ्यामध्ये २०२१ तसेच २०२२ या दोन वर्षांच्या स्वातंत्र्यदिनी जाहीर झालेली पोलीस पदके देण्यात आली. एक्केचाळीस (४१) पोलीस अधिकारी व जवानांना पोलीस शौर्य पदक, तीन (३) पोलीस अधिकाऱ्यांना उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक तसेच एकोणचाळीस (३९) पोलीस अधिकारी व अंमलदारांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदके प्रदान करण्यात आली.

पोलीस अलंकरण कार्यक्रमाला गृह राज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, महासमादेशक गृहरक्षक दल रितेश कुमार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ अर्चना त्यागी, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांसह पोलीस अधिकारी, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व गौरविण्यात आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

## आणीबाणीविरोधात उभे राहिलेल्या श्रीपाद मुसळे आणि प्रदीप काणेकरांचा सन्मान

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९७५ साली भारतीय संविधानाची पायमल्ली करत केवळ आपली एकाधिकारशाही टिकून राहण्याचे उद्देशाने भारत देशामध्ये आणीबणी लागू केली. आणीबाणी कालखंडामध्ये हुकूमशाही राजवट डोक्यावर मारणाऱ्या काँग्रेस राजवटीला लोकशाही टिकवण्याच्या उद्देशाने ज्यांनी ज्यांनी विरोध केला अशा देशाभिमानी नेत्यांना मिसा कायद्याच्या अंतर्गत जबरदस्तीने अटक करण्यात आले. श्रीपाद गंगाधर मुसळे आणि प्रदीप काणेकर आणि त्यांच्या २५० सहकाऱ्यांना इंदिरा गांधी यांच्या हुकूमशाहीचा फटका बसला होता. त्यांना भारतीय जनता पक्षाच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

श्रीपाद गंगाधर मुसळे यांना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी डॉक्टर मेधा किरीट सोमय्या, प्रदीप काणेकर व अन्य तीन यांनादेखील सन्मानित करण्यात आले.

आणीबाणीविरोधात वैचारिक बैठकीशी प्रामाणिक राहून शड्डू ठोकणाऱ्या तमाम वीरांना सन्मानित करताना भाजप मुख्य प्रवक्ता मुंबई निरंजन मोहिनी लक्ष्मण शेट्टी, कार्यालयीन सचिव मुकुंद कुलकर्णी, महाराष्ट्र शासन हज कमिटी सदस्य शकील काझी यांच्या समवेत अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर आदी उपस्थित होते. श्रीपाद मुसळे आणि प्रदीप काणेकर अर्थात सर्वांचे लाडके बाळा यांना प्रशस्तपीत्रक देऊन सन्मानित करताना अक्षरशः अंगावर काटा उभा राहिल्याची प्रतिक्रिया त्यांनी प्रतिनिधीला सांगितले.



## 'टिएमसी'मध्ये राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये गुरुवार दि. २६ जून रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती आणि आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ सेवन विरोधी दिन कार्यक्रम घेण्यात आला.

माणगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. के. जाधव यांनी आपल्या वक्तव्यातून राजश्री छत्रपती शाहू महाराजांच्या जीवन चरित्रावर आणि त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. तसेच अमली पदार्थ सेवनाने आपल्या शरीरावर काय दुष्परिणाम होतात याविषयी विविध उदाहरणे देऊन सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी अमली पदार्थ सेवनापासून दूर राहावे असे आवाहन केले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अमृता देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचून समाज सुधारकांविषयी ज्ञान मिळवावे असे सांगितले. आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त विद्यार्थ्यांना व्यसन विरोधी शपथ देण्यात आली. सदर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कार्यक्रम अधिकारी डॉ. जगदीश शिगवण यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी प्रा. हर्षल जोशी ,प्रा.अशोक मोरे, डॉ. नितीन मुटकुळे, प्रा. अमित बाकडे, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# रायगडात १ जुलैपासून शाळाबाह्य मुलांची शोधमोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील ३ ते १८ वयोगटातील शाळाबाह्य, अनियमित आणि स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांची विशेष शोधमोहीम १ जुलैपासून हाती घेण्यात येणार आहे. ही मोहीम १५ जुलैपर्यंत राबविली जाणार आहे.

या मोहिमेंतर्गत शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी दिली.

रायगड जिल्ह्यात प्राथमिक समग्र शिक्षा कार्यक्रमाची तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत ज्ञानरचनावादी शाळा, कृतीयुक्त अध्ययन पद्धती, डिजिटल शाळा, आयएसओ मानांकन, मोफत पाठ्यपुस्तक, मोफत गणवेश, मध्यान्ह भोजन, विविध शिष्यवृत्ती परीक्षा तयारी, नवोदय परीक्षा तयारी अशा प्रभावी उपक्रमांची अंमलबजावणी अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकांमार्फत शाळांमध्ये सुरू आहे, मात्र शासनाच्या अनेक योजना सुरू असतानाही अद्याप काही बालके शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास येत आहे. अशा बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता शोधमोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेत घरोघरी जाऊन शाळाबाह्य मुलांचे सवक्षण करण्याव्यतिरिक्त बसस्थानक, रेल्वेस्थानक, बाजारपेठ, वीटभट्ट्या, दगडखाणी, साखर कारखाने, स्थलांतरित कुटुंबे, जिल्ह्यातील सर्व खेडी, गाव, वाडी, तांडे, पाडे, शेतमळे, जंगल, बालगृह, निरीक्षणगृह, विशेष दत्तक संस्था आदी ठिकाणी जाऊन शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या नोंदी करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

शाळाबाह्य मुलांच्या विशेष शोधमोहीम अंतर्गत ३ ते ६ वयोगटातील जी बालके एकात्मिक बाल विकास योजनेचा लाभ घेत नाहीत तसेच खाजगी बालवाडी, इंग्रजी माध्यमांचे ज्युनिअर केजी, सिनिअर केजीमध्ये जात नाहीत अशा व ६ ते १८ वर्ष वयोगटातील शाळाबाह्य बालके यांची शोधमोहीम राबविण्यात येणार आहे. यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी केले आहे.



**पुणे : भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे तसेच सेक्टर ६चे प्रमुख शरद वाडीकर व अन्य ससहकारी यांनी ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे दर्शन घेऊन वारीमध्ये सहभाग नोंदवला.**

## महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त बालसभांचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आयुक्त.मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरूवार २६ जून रोजी राजर्षी शाहू महाराज जयंती अर्थात सामाजिक न्याय दिवसाचे औचित्य साधून मनपाच्या सर्व शाळांमध्ये बालसभेचे आयोजन करण्यात आले.

या निमित्त सर्व शाळांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना शिक्षकांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनाचा परीचय माहितीच्या रूपाने,गोष्टींच्या रूपाने सांगण्यात आला.



शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये होणाऱ्या सर्व उपक्रमांचे नियोजन केल्याप्रमाणे या बालसभांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी देण्याबाबतच्या सुचना शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी दिलेल्या होत्या.त्यानूसार या बाल सभेचे नियोजन करण्यात आले.

नविन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच बालसभेचे पालिकेच्या सर्व शाळांनी यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल चव्हाण यांनी सर्व विद्यार्थी,शिक्षक व मुख्याध्यापक यांचे कौतुक केले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराजांची १५१वी जयंती उत्साहात साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथे रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवार (दि. २६) रोजी दुपारी १२ वाजता स्टाफ स्टाफ वेल्फेअर समितीच्या वतीने राजश्री शाहू महाराजांची १५१वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी यावेळी राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले व विचार व्यक्त करताना म्हणाले की, ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सर्वसामान्य जनतेला ज्ञान मिळवून देण्याचे महान कार्य छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी केले. त्यांनी वंचित, आदिवासी, मागास व बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी केलेल्या महान शैक्षणिक कार्यामुळेच आज देशात समानता दिसून येत असल्याचेही ते म्हणाले तसेच छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनचरित्राचे प्रत्येकाने वाचन करून शाहू महाराजांचे कार्य समजून घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. रिजवान मोमीन समन्वय स्टाफ वेल्फेअर समिती यांनी केले तसेच तसेच स्टाफ वेल्फेअर समितीतील इतर सर्व सदस्य, विद्यार्थी व विद्यार्थिनी व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

पान १ वरून

## वीजदर कपातीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार

घरगुती वीज ग्राहकांमध्ये ७० टक्के प्रमाण हे १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे आहे व त्यांच्यासाठीच्या वीजदरात या वर्षी १० टक्के घट होणार आहे, तर पाच वर्षांच्या अखेरीस त्यांच्यासाठीचा वीजदर २६ टक्के कमी झालेला असेल. १०० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या वीज ग्राहकांसाठीच्या दरातही कपात होणार आहे. माननीय देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने आगामी काळात राज्याला किती विजेची गरज पडेल हे ध्यानात घेऊन रिसोर्स डेक्वसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार २०३०पर्यंत राज्याची विजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगावॅटचे वीजखरेदी करार केले आहेत. त्यापैकी ३१ हजार मेगावॅट वीज सौर, पवन अशा रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जास्रोतांमधून मिळणार आहे. ही वीज अत्यंत किफायतशीर दरात मिळणार असल्याने महावितरणच्या वीज खरेदी खर्चात खूप मोठी बचत होणार आहे. त्यामुळे महावितरणला वीजदर कपातीचा प्रस्ताव मांडता आला आणि आयोगानेही त्यानुसार आदेश दिला, असे अविनाश कोळी यांनी सांगितले.

भाजपने निवडणुकीच्या वेळी घरगुती ग्राहकांचे वीजदर कमी करण्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाचे पालन झाले आहे तसेच उद्योगांसाठीच्या वीजदरात कपात केल्यामुळे राज्यात उद्योगांची वाढ होण्यास मदत होईल, असेही अविनाश कोळी यांनी अधोरेखित केले.

# गेल प्रकल्पग्रस्तांना तातडीने प्रमाणपत्र द्या -खासदार सुनील तटकरे

**अलिबाग: प्रतिनिधी**

तालुक्यातील उसर परिसरात येणार्या गेल प्रकल्पामध्ये स्थानिकांना नोकर्या मिळाव्यात यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रकल्पासाठी ज्या शेतकर्यांनी जमीनी दिल्या आहेत त्यांना राज्य सरकारच्या नियमानुसार प्रकल्पग्रस्तांच्या व्याख्येत बसवून येत्या पाच दिवसात त्यांना प्रकल्पग्रस्तांचे दाखले देण्यात यावेत, असे आदेश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी दिली.

गुरूवारी (दि. २६) अलिबाग येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत खासदार सुनील तटकरे यांनी ही माहिती दिली.

गेल प्रकल्पग्रस्तांना ५ दिवसात प्रकल्पग्रस्तांचे दाखले देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. २६५ प्रकल्पग्रस्तांची यादी तयार करण्यात आली आहे. त्यातील किमान १०० जणांना सध्या सुरू असलेल्या कॉन्ट्रक्टच्या कामांमध्ये काम देण्यात यावे. गेल प्रकल्पामध्ये थेट सेवेत घेण्यासाठी प्रकल्पग्रस्तांची गुणवत्तेनुसार




यादी तयार करण्यात यावी. ती यादी गेलच्या स्थानिक प्रशासानाने त्यांच्या केंद्रीय प्रशासनाकडे पाठविण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. गेल प्रकल्पांने आपल्या सामाजिक उत्तर दायित्वाचा निधी स्थानिक ग्रामपंचयातींनाच द्यावा. या ग्रामपंचयातींची यादी गेल प्रशासनाला देण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत, असे सुनील तटकरे यांनी सांगितले.

दिघी औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात येत आहे. त्यासाठी ४० हजार कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी ३ हजार कोटी रूपये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी प्राप्त झाले आहेत. ही कामे लवकरच सुरु होतील. येथे ऑटोमोबाईल, सर्विस सेक्टरमधील प्रदुक्षणविरहित प्रकल्प आणले जातील. त्याचप्रमाणे ११० कोटी रूपये खर्चून रोहा येथे ट्रिपल सी आय टी

> **रायगड जिल्ह्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची शेकापबरोबर युती होईल अशी सुतराम शक्यता नाही**
> **-खासदार सुनील तटकरे**
> **प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस**

उभारण्यात येणार आहे. भविष्यात रायगड जिल्ह्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये ज्या नोकर्या मिळतील त्याचे प्रशिक्षण या ट्रिपल सी आय टी केंद्रात देण्यात येणार आहे. इंदापूर - माणगाव बायपासचे काम लकरच पूर्ण केले जाईल. त्यामुळे वाहतुकीची कोंडी सुटेल अशी माहिती खासदार तटकरे यांनी दिली.

अलिबाग तालुक्यातील कुरूळ येथील आरसीएफ वसाहतीचा गेट जनतेसाठी सुरू करावा अशा सुचना आरसीएफला देण्यात आल्या आहेत. चार दिवसात हा गेट खुला केला नाही तर वहिवाटीचा रस्ता म्हणून प्रांतानीं हा रस्ता सुरू करावा असे आदेश देण्यात आले असल्याची माहिती खासदार सुनिल तटकरे यांनी दिली.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अलिबाग तालुका अध्यक्ष जयेंद्र भगत, अलिबाग-मुरूड विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष अमित नाईक, हर्षल पाटील, उमा मुंडे यावेळी उपस्थित होते.

## उरण तालुका चिटणीस निशा म्हात्रेंचा वाढदिवस साजरा

**उरण : वार्ताहर**

भाजप उरण तालुका महिला मोर्च्या चिटणीस निशाप्रितम म्हात्रे यांचा वाढदिवस गुरुवार ( दि. २६ )रोजी आमदार महेश बालदी संपर्क कार्यालय उरण येथे साजरा करण्यात आला.

या वेळी संपर्क प्रमुख रवी भोईर,भाजप उरण तालुकासरचिणीस सुनील पाटील,प्रितम म्हात्रे,उरण पूर्वविभाग अध्यक्ष शशी पाटील,उरण तालुका ग्रामीणमंडळ अध्यक्ष धनेश गावंड ,चाणजे विभाग अध्यक्षजितेंद्र घरत,उरण शहर मंडळ अध्यक्ष प्रसादभोईर,भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंदगावंड,कोप्रोली गाव अध्यक्ष सचिन गावंड ,कोप्रोली कार्याध्यक्ष निलेश पाटील,भाजप संयुक्त वाहतूकसंघटना सरचिटणीस रायगड सुदेश पाटील,प्रेममढवी,जसखार गाव अध्यक्ष अक्षय घरत आदी मान्यवर उपस्थित होते.



# पनवेल महापालिकेची प्लास्टिकविरोधी कारवाई

## पिशव्यांचा १२५ किलो साठा जप्त, १० हजारांचा दंड वसूल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या खारघर प्रभागांमध्ये दिनांक २५ जून रोजी प्लास्टिक विरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये सुमारे १२५ किलो सिंगल युज प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला. तसेच सुमारे १० हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात बुधवारी मोठी प्लास्टिक विरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये प्रभाग समिती 'अ' खारघर प्रभागामध्ये सेक्टर ३५ नीलकंठ स्वीट, रावेची मार्ट असे विविध स्वीट मार्ट,बाजार अशा अनेक ठिकाणी प्लास्टिक पिशवी (सिंगल युझ प्लास्टिक) कारवाई करण्यात आली. या कारवाईवेळी स्वचछता निरीक्षक कुणाल गायकवाड, अतुल मोहोकर, संदिप भोईर अतिक्रमण पथकाचे शिवदास पाटील, व कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महापालिका क्षेत्रात एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिकवरती प्रतिबंध करण्यात आला आहे. उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार प्रतिबंधित प्लास्टिकची साठवणूक, विक्री आणि वापर करणाऱ्यांवर महानगरपालिकेच्यावतीने कठोर कारवाई करण्यात येत आहे. प्लास्टिक विरोधी कारवाईमध्ये पहिला गुन्हा नोंद झाल्यावर ५ हजार रुपये, दुसरा गुन्हा नोंद झाल्यावर १० हजार रुपये ,तिसरा गुन्हा नोंद झाल्यावर २५ हजार रूपये दंड आणि तीन महिन्याचा कारावास असणार आहे.तरी महापालिका कार्यक्षेत्रातील विविध आस्थापनांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर करू नये असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.



# महिलेचे मंगळसूत्र खेचून चोरटा पसार

**पनवेल : वार्ताहर**

पायी चालत जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील ६० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र खेचल्याची खारघरमध्ये घडली. या प्रकरणी खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार नीलम मतकर (३९) या खारघर सेक्टर १०मध्ये कुटुंबासह राहण्यास आहेत. त्या मुलीला क्लासवरून आणण्यासाठी खारघर टोलनाका जवळच्या कच्च्या रोडवरून चालत जात होत्या. या वेळी त्यांच्या समोरून आलेल्या एका लुटारुने अचानक त्यांच्या गळ्यातील ६० हजार रुपये किंमतीचे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र खेचले. त्यांनी आरडाओरडा करत चोराच्या पाठीमागे जाण्याचा प्रयत्न केला, मात्र तो सापडला नाही. त्यांनी नंतर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली.

# ट्रकच्या धडकेत पोलीस उपनिरीक्षक जखमी

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहतीमधून मुंबई व पुणेकडे जाणाऱ्या रोडपाली फुडलॉण्ड येथील उड्डाणपुलावर भरधाव ट्रकने पोलीस उपनिरीक्षकाला धडक दिल्याची घटना घडली. सध्या जखमी पोलीस उपनिरीक्षकावर उपचार सुरू आहेत. वाहतूक विभागात काम करणारे पोलीस उपनिरीक्षक शैलेश भर्दे हे पोलीस हवालदार आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानासोबत स्वतः वाहतूक नियमन करत होते. अचानक तळोजाच्या दिशेने उड्डाणपुलावरून भरधाव वेगाने ट्रकचालक ४२ वर्षीय गौतम जाधव (कर्जत, अहमदनगर) याने ट्रक सेवा रस्त्याला वळविताना रस्त्याकडेला नियमनाचे काम करणाऱ्या उपनिरीक्षक गर्दे यांना धडक दिली. या दुर्घटनेत त्यांच्या डोक्याला मार लागला आहे.



**पनवेल : भाजपचे पनवेलमधील ज्येष्ठ कार्यकर्ते मधुकर उरणकर यांचे वाढदिवसानिमित्त पक्षाचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभीष्टचिंतन केले.**

# राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्ताने महापालिका मुख्यालयात अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात गुरुवारी (दि.२६) रोजी सामाजिक समतेची शिकवण देणारे, लोकनेते राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त रविकिरण घोडके, मंगला माळवे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, सचिव अक्षय कदम, लेखा परिक्षक संदीप खुरपे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भगवान गीते, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी व पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून भाग्यश्री आणि मयुरी शिंदे यांना आर्थिक मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील कैलास गोपाळराव शिंदे यांच्या कन्या भाग्यश्री आणि मयुरी शिंदे यांना उच्च शिक्षणासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून आर्थिक मदत करण्यात आली असून सदरचा धनादेश श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २६) सुपूर्द करण्यात आले.



सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या तीस वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतः च्या पायावर उभे केले जाते. भाग्यश्री शिंदे पिल्लई महाविद्यालयात बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (बीएमएस) तर मयुरी शिंदे बॅचलर ऑफ अकाऊंटींग अँड फायनान्स (बीएएफ) हे शिक्षण घेत असून भाग्यश्रीला ४१ हजार ८३० रुपये तर मयुरीला ८० हजार ४५० रुपयांची आर्थिक मदतीची आवश्यकता होती.

आर्थिक अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मदत करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी संधी उपलब्ध करून देणे, हा मंडळाचा नेहमीचा उद्देश राहिला आहे, त्यानुसार हि मदत करण्यात आली. सदरचा धनादेश देताना भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, सुरेश पोरजी, महेंद्र गोजे, पालक कैलास शिंदे, मंडळाचे व्यवस्थापक अनिल कोळी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी घेतली अमली पदार्थविरोधी शपथ

## पोलिसांचा पुढाकार, ३०० विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सहभाग

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीतील सुधागड विद्या संकुलातील ज्युनियर कॉलेज कळंबोली या विद्यालयातील सभागृहात २६ जून २०२५ रोजी सकाळी जागतिक अंमली पदार्थविरोधी दिनाची शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली.

या वेळी शाळेचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमासाठी दहशतवाद विरोधी पथक नवी मुंबई युनिटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तुकाराम नलावडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश पाटील, पोलीस हवालदार प्रदीप खाडे, ज्युनियर कॉलेजचे उपप्राचार्य संजय पाटील, सायन्स विभाग प्रमुख किशोर पाटील, कॉमर्स विभाग प्रमुख नजीर शेख, आर्ट्स विभाग प्रमुख अण्णासाहेब झिटे, सांस्कृतिक विभाग प्रमुख शीतल शिंदे असे मान्यवर सह ज्युनियर कॉलेजच्या सांस्कृतिक विभागातील व तिन्ही शाखेतील प्राध्यापकांसह बारावीतील चार वर्गांचे ३०० विद्यार्थी उपस्थित होते.



वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री नलावडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश पाटील यांच्या हस्ते सरस्वती पूजन, दादासाहेब लिमये यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. दहशतवादविरोधी पथक नवी मुंबई युनिटचे मान्यवर अधिकारी व ज्युनियर कॉलेजचे विभाग प्रमुख व्यासपीठावर विराजमान होते.

या वेळी उपस्थित मान्यवरांचा परिचय चारू तबकडे यांनी करून दिला. श्री. नलावडे यांचे स्वागत संजय पाटील यांनी केले, राजेश पाटील यांचे स्वागत किशोर पाटील यांनी केले, तर प्रदीप खाडे यांचे स्वागत नजीर शेख यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना संजय पाटील यांनी अमली पदार्थाच्या विळख्यात सापडलेल्या तरुणाईला व्यसनांचे दुष्परिणाम बाबत मार्गदर्शन केले तर वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नलावडे यांनी अंमली पदार्थांची तस्करी, व्यसनाचे आधीन झालेल्यांचे स्वतःसह कुटुंबाची झालेली वाताहात, शत्रू राष्ट्रांकडून आपल्या देशातील तरुणांची क्रयशक्ती खच्चीकरणाचे प्रयत्न इत्यादी विषयावर सखोल उद्बोधन केले. उपस्थित सर्व ३०० विद्यार्थी आणि २२ शिक्षकांना या वेळी अंमली पदार्थ विरोध करणारी शपथ श्री नलावडे यांनी करून घेतली. विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख शीतल शिंदे यांनी या कार्यक्रमाचे प्रभावी निवेदन व आभार प्रकटीकरण केले.

# उरण तालुक्यात जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

**उरण : प्रतिनिधी**

निसर्गाशी नाते सांगणाऱ्या शेतकऱ्यांना यंदा पावसाने चांगलेच रंग दाखविल्याने शेतकऱ्यांची पुरती वाट लागली आहे. यंदा पावसाला मे महिन्यातच सुरुवात झाल्याने पेरणी वाया जाण्याच्या भीतने शेतकऱ्यांनी सुरुवातीला भात पेरणी केली नाही. त्यानंतर पाऊस सारखाच कोसळत राहिला. त्यामुळे अनेक ठिकाणच्या शेतकऱ्यांनी जूनच्या पाच-सहा तारखेपासून पेरणीला सुरुवात केली, मात्र पावसाचा वेग वाढतच राहिला. त्यामुळे भातरोपे तयार न होताच भात कुजून गेली. निसर्गाशी नाते सांगणाऱ्या शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढावले आहे.



परिसरात पाऊस थांबण्याचे नाव घेत नसल्यामुळे महागडे भात बियाणे शेतात कुजून गेले आहे. आता भात बियाणे केंद्रावर मिळत नसल्यामुळे तसेच घरातील उरल्या सुरल्या भात बियाण्यांचा देखील शेतकऱ्यांनी वापर केल्यामुळे शेतकऱ्यांना बियाण्याच्या भाताची पंचायत झाली आहे. विशेषतः धुवांधार कोसळणाऱ्या पावसाने या भात बियाणाला उगविण्याची संधीच दिली नाही. त्यामुळे तालुक्याबरोबर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर शेती ओसाड ठेवण्याची वेळ आली आहे. खरीप हंगामातील भात पेरणीला जून महिन्यातच खरी सुरुवात करता आली नाही आणि ज्या शेतकऱ्यांनी भात बियाणे पेरले होते. त्या शेतकऱ्यांचे भातराबातील बियाणेच पुरते कुजून गेले आहे.

त्यामुळे शेतकरी पुरता धास्तावला आहे. धूळपेरणीला पावसामुळे संधीच मिळाली नाही. त्यामुळे धूळपेरणी भर पावसात करता आली नाही. दरवर्षी मृग नक्षत्रात शेतकरी पेरणी करतात, मात्र यंदा मान्सूनपूर्व पावसाने कहरच केल्याने पेरण्या लांबणीवर पडल्या. आणि अनेक ठिकाणी ज्या शेतकऱ्यांनी भात पेरण्या केल्या त्या कुजून गेल्या आहेत. रानपाखरे भाताच्या राबातील भाताचे दाणे टिपून खात असल्यामुळे या रानपाखरांनीही शेतकऱ्यांना हैराण केले आहे. त्यामुळे येथील शेतकरी संकटात सापडला असून, आता धास्तावले आहेत. महागडी बियाणे खरेदी करून अनेक ठिकाणच्या शेतकऱ्यांनी दुबार पेरणी केली. मात्र भाताची उगवण व्यवस्थित रित्या न झाल्याने बळीराजा धास्तावला आहे. यावर्षी सततच्या पावसामुळे जमिनीत ओलावा राहिल्याने रोपांच्या उगवण क्षमतेवर परिणाम झाला असून काही ठिकाणी उगवलेली रोपे फार कमकुवत असल्याचे कृषी मित्र शेतकरी प्रफुल्ल खारपाटील व शेतकरी रमेश फोफेरकर यांनी सांगितले.

महागडी बियाणे, वाढत्या मजुरीचे दर आणि भातरोपे कुजून गेल्यामुळे बहुतांशी शेतकरी यंदा भात शेती ओसाड ठेवणार असल्याचे बोलले जात आहे. उरण तालुका हा एकेकाळी भाताचे कोठार म्हणून ओळखला जात असे, परंतु वाढत्या औद्योगिकीकरणामुळे तालुक्यातील भात लागवड क्षेत्र कमी झाले आहे. उरण तालुक्यात आजही पारंपरिक पद्धतीने भातशेती केली जाते.

मात्र पावसामुळे काही ठिकाणी खरीप हंगामातील भात पेरणी हवी तशी न झाल्यामुळे भातरोपे उगवलीच नाही. धूळपेरणीला संधी न मिळाल्यामुळे जी उन्हाची उब महत्त्वाची आहे. ती उब शेतात साचलेल्या पाण्यामुळे मिळाली नाही. त्यामुळे भात रोपांची अवस्था फार बिकट आहे. महत्त्वाचे म्हणजे भात लागवडीसाठी भात रोपेच नसतील तर शेतकऱ्यांना भात शेतीची लागवड करणे अवघड झाले आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात ड्रग्जविरोधी सेमिनार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात अंमली पदार्थ विरोधी सेमिनारचे आयोजन २६ जून २०२५ या दिवशी करण्यात आले होते. २६ जून हा दिवस सर्वत्र आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थविरोधी दिन साजरा केला जातो.



या दिनाचे औचित्य साधून रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात वेगवेगळया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुन्हे शाखा, अंमलीपदार्थ विरोधी विभाग, नवी मुंबईचे पोलीस निरीक्षक संदीप निगडे हे प्रमुख व्याख्याता म्हणून होते. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना अंमली पदार्थाचे दुपरिणाम, त्यांच्या वापरामुळे होणारे मानसिक, शारीरिक आणि सामाजिक नुकसान याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर विद्यालयाच्या वतीने 'अंमली पदार्थाबाबत जनजागृती' या विषयावर एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या सृजनशीलतेव्दारे अंमली पदार्थाचे दुष्परिणाम मांडण्याची आणि समाजात जनजागृती घडविण्याचीएक उत्तम सुवर्ण संधी आहे.

या स्पर्धेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीचे महत्व पटवून देणे आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रचार करणे हा होता. कार्यक्रमास प्राचार्य निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात राजर्षी शाहू महाराजांची जयंती साजरी

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

आधुनिक शिक्षणाचे पुरस्कर्ते, सत्यशोधक समाजाची चळवळ पुढे नेणारे आणि कर्मवीर अण्णांनी ज्यांच्यापासून बोर्डिंगची प्रेरणा घेऊन साताऱ्यात राजश्री शाहू महाराज बोर्डिंग सुरू केली त्या राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीचा कार्यक्रम उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात साजरा करण्यात आला.

विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक भरणुके यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन केले. आधुनिक विचारांचे पुरस्कर्ते म्हणून ज्यांची प्रसिद्धी आहे त्या शाहू महाराजांनी संस्थानिक म्हणून बडेजाव मिरवला नाही, तर समाजाचे अश्रू पुसून आधार देण्याचे महान कार्य केले, असे विचार मांडले. विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागप्रमुख भारती म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर डी.जी. पाटील, सौ. पाटील आणि सौ. म्हात्रे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाचे योगदान दिले.



## संपादकीय

# ‘गगनयान’ची तयारी!

भारताच्या हवाई दलातील ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्यासह एकूण चार अंतराळवीर बुधवारी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाकडे रवाना झाले. शुभांशु यांचा अंतराळातील हा प्रवास ही भारताच्या अंतराळातील मानवी मोहिमांची सुरूवात असून बहुप्रतिक्षित ‘गगनयान’ मोहिमेला यातून मोठे बळ मिळणार आहे.

**‘गगनयान’ ही भारताची स्वत:ची पहिली मानवी अंतराळ मोहीम असणार आहे. यात भारतीय अंतराळवीराला भारतीय रॉकेटच्या मदतीने श्रीहरिकोटा येथील स्पेस सेंटरमधून अंतराळात पाठवले जाणार आहे. बहुदा २०२७ मध्ये ही मोहीम राबवली जाईल अशी आशा असून बुधवारी अवकाशात झेपावून एव्हाना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर दाखल झालेले शुभांशू शुक्ला हे ‘गगनयान’ मोहिमेसाठी निवडलेल्या चार अंतराळवीरांपैकीच एक आहेत. कोविड महामारी, पाठोपाठ पुरवठा साखळीत निर्माण झालेले प्रश्न आणि तांत्रिक अडथळ्यांमुळे गगनयान मोहिमेला काहीसा विलंब झाला असला तरी तिचा पाया भरभक्कम आहे हेच शुभांशू शुक्ला यशस्वीरित्या अवकाशात पोहोचण्यातून अधोरेखित होते. २१ व्या शतकात स्पष्टपणे दिसू लागलेल्या अंतराळस्पर्धेतील भारत हा एक गांभीर्याने घेण्याजोगा साथीदार आहे हेही या मोहिमेतून स्पष्ट झाले आहे. आजवर केवळ अमेरिका, रशिया आणि चीन यांनीच स्वबळावर आपले अंतराळवीर अवकाशात पाठवले आहेत. शुभांशू यांच्या रूपाने ४१ वर्षांनी पुन्हा एकदा भारतीय अंतराळवीराने अंतराळात पाऊल टाकले आहे. भारतीय वेळेनुसार बुधवारी दुपारी १२ वाजता फ्लोरिडा येथील ‘नासा’च्या केनेडी स्पेस सेंटरवरून यान प्रक्षेपित झाले. ‘स्पेसएक्स’च्या फाल्कन–९ रॉकेटशी जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमधून सर्व अंतराळवीरांनी उड्डाण केले. हे स्पेसक्राफ्ट सुमारे २८ तासांनंतर गुरुवारी संध्याकाळी चार वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाशी जोडले गेले. अंतराळस्थानकात पोहोचल्यावर शुभांशू यांनी हिंदीतून संवाद साधला. ‘आप के प्यार और आशीर्वाद से मैं इंटरनॅशनल स्पेस स्टेशनपर पहुंचा हूं’ असे ते म्हणाले. ‘नासा’ व ‘इस्रो’ यांच्यातील करारानुसार शुभांशू शुक्ला यांची या मिशनसाठी निवड झाली. शुभांशू यांच्यासोबत अमेरिका, हंगेरी आणि पोलंडचे अंतराळवीरही आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेशी केलेला अंतराळ सहकार्याचा करार आता प्रत्यक्षात येतो आहे. शुभांशू हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले आणि अंतराळात जाणारे दुसरे भारतीय ठरले आहेत. १९८४ मध्ये भारताचे पहिले अंतराळवीर ठरलेले राकेश शर्मा रशियन यानातून अवकाश प्रवासासाठी गेले होते. तेव्हा शुभांशू यांचा जन्मही झाला नव्हता. १९८५ मध्ये जन्मलेले शुभांशू लखनौचे रहिवासी आहेत. यापूर्वी कल्पना चावला व सुनिता विल्यम्स यांनी ‘नासा’च्या अंतराळवीर म्हणून भरीव कामगिरी केली आहे. या दोघीही भारतीय वंशाच्या असल्या तरी त्या भारतीय नागरिक नाहीत. शुभांशू ज्या मोहिमेतून अंतराळात गेले, ती क्सिऑम कंपनीची चौथी मोहीम आहे. शुभांशू दोन आठवडे अंतराळस्थानकावर वास्तव्य करतील व अनेक प्रयोगांमध्ये सहभागी होतील. क्सिऑम–४ ही व्यावसायिक मोहीम असून अमेरिकन कंपनी ‘क्सिऑम स्पेस’ने नासा आणि इलॉन मस्क यांची ‘स्पेसएक्स’ यांच्या सहकार्याने ती आखली आहे. नासाखेरीज भारताची इस्रो आणि युरोपियन स्पेस एजन्सी या अंतराळ संस्थांचाही यात सहभाग आहे. यापूर्वी निरनिराळ्या कारणांमुळे ‘क्सिऑम–४’चे प्रक्षेपण पुढे ढकलण्यात आले होते. अंतराळातील वास्तव्यात शुभांशू भारतीय संस्थांच्या समन्वयातून प्रयोग करणार असून यात अन्न तसेच सूक्ष्मजीवांच्या अभ्यासाचा समावेश आहे. हे प्रयोग गगनयानच्या तयारीला भरीव मदत करतील.**

# कुंडलिका रिव्हर राफ्टिंग : साहस व निसर्गसौंदर्याची अनुभूती





**खबरबात**
धम्मशील सावंत

रायगडमधील रोहा तालुक्यातील कोलाड हे ठिकाण खास रिव्हर राफ्टिंगसाठी प्रसिद्ध आहे. कुंडलिका या दक्षिण भारतातील वेगवान वाहणाऱ्या नद्यांमधील प्रसिद्ध नदीत या रिव्हर राफ्टिंगचा थरार अनुभवला जातोय. साजे ते कामत असा १२ किमीचा राफ्टिंग थरार अनुभवण्यासाठी हजारो पर्यटक दाखल होतात.

तज्ज्ञ अनुभवी गाईड व स्पेशल बचाव पथक तैनात असल्याने पर्यटक रिव्हर राफ्टिंगचा थरार बिनधास्तपणे अनुभवतात. पर्यटकांना भुरळ घालणारा हा खेळ सारेच अनुभवू पाहत आहेत. हिरवाईने नटलेल्या या परिसरात कोलाड रिव्हर राफ्टिंग या साहसी व लोकप्रिय खेळाचे पर्यटकांना खास आकर्षण आहे. नदीतून राफ्टमार्फत भटकंती करून आगळी वेगळी मजा अनुभवता येणारी ही उत्तम राफ्टिंग आहे. १८ वर्षांपासून पुढे असणाऱ्या युवकांना या रिव्हर राफ्टिंग प्रवेश दिला जातो. कुंडलिका नदीवरील रिव्हर राफ्टिंगचा थरार अनुभवायला पर्यटकांना परिपूर्ण माहिती व प्रशिक्षण दिले जाते.कोलाडमधील कुंडलिका नदीतील रिव्हर राफ्टिंगचा थरार महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध अ‍ॅडव्हेंचर अ‍ॅक्टिव्हिटी आहे. येथे येणारे पर्यटक या अ‍ॅडव्हेंचरचा आनंद घेतात, जिथे त्यांना वेगाने वाहणाऱ्या पाण्यातून राफ्टिंगचा अनुभव मिळतो. कोलाडमधील रिव्हर राफ्टिंग एक रोमांचक अनुभव असतो, जो निसर्गाच्या सान्निध्यात येतो.

आता कोलाडच्या रिव्हर राफ्टिंगकडे पर्यटकांची पाऊले वळाली असून इथं मोठी गर्दी उसळते. थरार, साहस आणि निसर्ग सौंदर्याच्या अद्वितीय रिव्हर राफ्टिंग अनुभूतीसाठी पर्यटकांची कोलाडला पहिली पसंती मिळतेय. पावसाळ्यात कोलाडमध्ये पर्यटक व्हाईट रिव्हर राफ्टिंगचा थरारक अनुभव घेऊन सुखावतात. पोहता येणारे तसेच पोहता न येणारे पर्यटकही रिव्हर राफ्टिंगचा आनंद लुटू शकतात. राज्यभरातील मोठ मोठे युवक युवतींचे ग्रुप येथे दाखल होत असल्याने पर्यटन आधारित स्थानिकांच्या व्यवसाय व रोजगारालादेखील मोठी चालना मिळते. राज्यभरातून कोलाडच्या कुंडलिका नदीवर रिव्हर राफ्टिंगचा थरार अनुभवून मौज मस्ती करण्यासाठी पर्यटक हजारोंच्या संख्येने दाखल होत असल्याने रायगडातील निसर्गरम्य पर्यटनस्थळे बहरून निघालीत.

राफ्टिंगसाठी कोलाड कुंडलिका नदीवर आलेले डॉ. हमदूले म्हणाले की, आपल्या कोकणात निसर्गाच्या सानिध्यात अतिशय सुंदर रिव्हर राफ्टिंगची व्यवस्था आहे. सुरक्षित व तज्ज्ञ गाईड यांनी व्यवस्थित मार्गदर्शन केले. थरारक रॅपिड होते, आम्ही खूप एन्जॉय केले. धम्माल आली. प्रत्येकाने एकदा तरी या रिव्हर राफ्टिंगचा थरार अनुभवावा.

मुंबईतून आलेले हसमुख शेलार यांनी सांगितले की, आम्ही खूप ऐकून होतो राफ्टिंगबद्दल, आम्ही १२ ते १३ लोक आलो होतो, खूप थरार आहे, मज्जा आहे. सुरक्षा यंत्रणा वाखाणण्याजोगी आहे. मुंबईच्या अगदी जवळ कोलाड येथे राफ्टिंग सुविधा असल्याने सर्वांनी इथं येऊन मौजमस्ती केली पाहिजे.

रिव्हर राफ्टिंगचा थरार अनुभवलेल्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी, आम्ही कोलाड फिरायला आलो. रिव्हर राफ्टिंग अप्रतिम व सुरक्षित आहे. स्विमिंग, सिंगिंगचाही अनुभव या वेळी घेता आला. पूर्ण कुटुंबाने कुंडलिका नदीत फेसळणाऱ्या पाण्यात राफ्टिंगचा थरार अनुभवला, असे सांगितले. एकूणच साहस आणि निसर्ग यांची अनुभूती घेण्यासाठी कुंडलिका रिव्हर राफ्टिंग एकदा केले पाहिजे.

# शिक्षणतज्ज्ञ व चरित्रकार द.न. गोखले

चरित्रकार, शिक्षणतज्ज्ञ, समीक्षक व शिक्षणतज्ज्ञ दत्तात्रेय नरसिंह गोखले उर्फ द. न. गोखले यांची आज पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

दत्तात्रेय नरसिंह गोखले यांचा जन्म बिरवाडी (जि.रायगड) येथे २० सप्टेंबर १९२२ रोजी झाला. कुरुंदवाड हायस्कूलमधून १९४०मध्ये मॅट्रिक व १९५२मध्ये ‘डॉ. केतकर: व्यक्ती व वाङ्मय’ हा प्रबंध सादर करून पुणे विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांना या विद्यापीठाचे न.चिं. केळकर पारितोषिक मिळाले. पुढच्याच वर्षी ते टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशनमधून बी.टी. परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. अनुदान संहिता सुधारण्यासाठी १९६० साली नेमलेल्या समितीचे सदस्य या नात्याने त्यांनी महाराष्ट्र शासनास अनेक सुधारणा सुचविल्या. पुढच्याच वर्षी फुलब्राइट शिष्यवृत्ती मिळवून अमेरिकेत गेलेल्या या कुशाग्र बुद्धीच्या गृहस्थाने हार्वर्ड व अन्य विद्यापीठांत जाऊन माध्यमिक शाळांचा सखोल अभ्यास केला आणि ‘अमेरिकेतील माध्यमिक शाळा’ नावाचे पुस्तक लिहिले. एक आदर्श शिक्षक म्हणून त्यांना राष्ट्रीय




पुरस्कार लाभला व राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांचा गौरव केला गेला (१९६९). डेक्कन एज्यूकेशन सोसायटीच्या पुणे व सातारा येथील हायस्कूलमध्ये त्यांनी १४ वर्षे मुख्याध्यापकपद भूषविले व नंतर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये आणि मुंबईच्या कीर्ती महाविद्यालयामध्ये मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्य केले.

कुरुंदवाड व सांगली येथे शिक्षण घेत असताना त्यांची जडणघडण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रभावात झाली. सांगली येथेच त्यांनी बाबाराव सावरकर यांची जीवनकथा त्यांच्याच तोंडून कित्येक महिने ऐकली. सुमारे १०० सहकार्यांच्या व परिचितांच्या भेटीगाठी घेऊन त्यांच्याशी झालेल्या संभाषणांतून बाबारावांच्या जीवनाचे अनेक पैलू त्यांना समजले. या परिश्रमांतून १९४७मध्ये गोखले लिखित ‘क्रांतिवीर बाबाराव सावरकर’ हा ग्रंथ हा साकारला.

डॉ. गोखले यांच्या डॉ. केतकर (१९५९) चरित्राला, डॉ. पटवर्धन उर्फ माधव ज्युलियन (१९७८) चरित्राला, स्वातंत्र्यवीर सावरकर : एक रहस्य (१९८९) या व्यक्तिविमर्शाला; गांधीजी: मानव नि महामानव (१९९६) या व्यक्तिविमर्शाला आणि शुद्धलेखन विवेक (१९९३) या शास्त्र विवरणाला महाराष्ट्र राज्य पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक पुरस्कार, न.चिं.केळकर पुरस्कार इत्यादी पुरस्कार लाभलेले आहेत.


**–वि.ग. जोशी (महाराष्ट्र नायक)**



## बदलते तंत्रज्ञान

# एकच व्हॉट्सअ‍ॅप अकाऊंट दोन स्मार्टफोनवर चालवा

तुम्ही व्हॉट्सअ‍ॅप युजर्स असाल तर ही बातमी तुमच्यासाठी खास आहे. तुम्ही एकाच नंबरचे व्हॉट्सअ‍ॅप अकाऊंट दोन वेगवेगळ्या फोनमध्ये वापरू शकतात. हो. आता हे तुम्हाला करता येऊ शकतं. पण, हे कसं शक्य आहे, तर चला याचविषयीची माहिती पुढे जाणून घेऊया.



ज्यांना आपल्या प्राथमिक आणि दुय्यम दोन्ही फोनवर एकच व्हॉट्सअ‍ॅप अकाऊंट अ‍ॅक्सेस करायचे आहे त्यांच्यासाठी हे फीचर खूप उपयुक्त आहे. यासाठी तुम्हाला इतर कोणत्याही अ‍ॅपची ही गरज नाही. व्हॉट्सअ‍ॅप स्वत: आपल्या युजर्सना ही सुविधा देते. चला तर मग जाणून घेऊया कशी काम करते ही भन्नाट ट्रिक.

युजर्सच्या सोयीसाठी व्हॉट्सअ‍ॅपवर अनेक फीचर्स उपलब्ध आहेत. यापैकी एका फीचरच्या मदतीने एकच व्हॉट्सअ‍ॅप अकाऊंट दोन स्मार्टफोनवर वापरता येणार आहे. व्हॉट्सअ‍ॅपचे हे नवे फीचर ’कॉम्पॅनियन मोड’ किंवा ’लिंक्ड डिव्हाइस’ म्हणून ओळखले जाते. तुमच्या दुसऱ्या फोनवर व्हॉट्सअ‍ॅप इन्स्टॉल करा ज्यावर तुम्हाला त्याच नंबरने व्हॉट्सअ‍ॅप चालवायचे आहे. जेव्हा आपल्याला नंबर प्रविष्ट करण्यास सांगितले जाते तेव्हा अ‍ॅप उघडा आणि Agree and Continue वर टॅप करा. आता तुम्हाला एक स्क्रीन दिसेल जिथे तुमचा फोन नंबर टाकण्याचा पर्याय असेल. त्याऐवजी, आपल्याला वरच्या उजव्या बाजूला असलेल्या तीन उभ्या बिंदूंवर क्लिक करणे आवश्यक आहे आणि नंतर Link as a Companion Device वर क्लिक करणे आवश्यक आहे. त्यानंतर फोनवर ठ कोड दिसेल.

आता तुमच्या प्रायमरी फोनमध्ये व्हॉट्सअ‍ॅप ओपन करा आणि वरच्या उजव्या बाजूला असलेल्या तीन डॉट्सवर टॅप करा. त्यानंतर लिंक्ड डिव्हाइसवर टॅप करा आणि नंतर लिंक ए डिव्हाइस पर्यायावर टॅप करा. आता तुमच्या प्रायमरी फोनचा कॅमेरा वापरून सेकंडरी फोनवर दिसणारा QR कोड स्कॅन करा.

QR कोड स्कॅन केल्यानंतर तुमच्या दुय्यम फोनवरील व्हॉट्सअ‍ॅप काही सेकंदात तुमच्या प्रायमरी अकाऊंटशी सिंक होईल. आता तुम्ही दोन्ही फोनवर एकाच नंबरवरून तुमचे मेसेज पाठवू आणि रिसिव्ह करू शकाल. हे फीचर तुमच्या चॅट, मीडिया आणि कॉन्टॅक्ट्सला दोन्ही डिव्हाइसवर सिंक ठेवते. ज्यांच्याकडे दोन फोन आहेत आणि कोणत्याही अतिरिक्त सिमकार्ड किंवा इतर क्रमांकाशिवाय दोघांवर व्हॉट्सअ‍ॅप चॅट सुरू ठेवू इच्छितात त्यांच्यासाठी हे फीचर उपयुक्त ठरू शकते.

# साहित्यिक, पत्रकार शिवराम परांजपे

शिवराम महादेव परांजपे हे प्रखर राष्ट्रीय बाण्याचे साहित्यिक, पत्रकार व प्रभावी वक्ते होते. त्यांचा जन्म कुलाबा (आताचा रायगड) जिल्ह्यातील महाड येथे २७ जून १८६४ रोजी झाला. त्यांचे वडील एक यशस्वी वकील होते. शिवरामपंतांच्या आईचे नाव पार्वतीबाई.

शिवरामपंतांचे प्राथमिक शिक्षण महाड येथे माध्यमिक शिक्षण रत्नागिरीस व पुण्यास आणि महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन आणि डेक्कन कॉलेजांत झाले. रत्नागिरीच्या शाळेत विष्णूशास्त्री चिपळूणकर त्यांना शिक्षक म्हणून लाभले. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिवरामपंतांनी प्रवेश घेतला तो विष्णुशास्त्रांच्या प्रभावातून. १८७५मध्ये गोरेगावचे गणेशपंत गोखले ह्यांची कन्या बयोताई हिच्याशी शिवरामपंतांचा विवाह झाला. १८८४मध्ये संस्कृतची जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळवून ते मॅट्रिक झाले. ही शिष्यवृत्ती मिळविणारे ते पहिले विद्यार्थी. १८९५मध्ये ते एमए झाले. या परीक्षेत त्यांना ‘गोकुळदास’ आणि ‘झाला वेदान्त’ अशी दोन पारितोषिके मिळाली. त्यानंतर पुण्यात नवीनच स्थापन झालेल्या महाराष्ट्र कॉलेजात दोन वर्षे (१८९६ १८९७) ते संस्कृतचे प्राध्यापक होते. तथापि, टिळकांच्या नेतृत्वाखालील प्रत्येक चळवळीत त्यांचे समरसतेने सहभागी होणे



**निमित्त**

या कॉलेजला अडचणीचे वाटू लागल्यामुळे त्यांना ही प्राध्यापकाची नोकरी सोडून द्यावी लागली. १८९८मध्ये उत्कट देशाभिमानाच्या प्रेरणेने त्यांनी काळ हे साप्ताहिक सुरू केले. १९०८मध्ये याच पत्रातील काही लेखांच्या आधारे सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवला. या खटल्यात त्यांना १९ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा झाली. तथापि, १५ महिन्यांच्या बंदिवासानंतर ५ ऑक्टोबर १९०९ रोजी त्यांची मुक्तता करण्यात आली. त्यानंतर १९१० साली सरकारने त्यांच्याकडून मागितलेला १० हजार रुपयांचा जामीन देऊ न शकल्यामुळे काळ साप्ताहिक त्यांना बंद करावे लागले. १९०० ते १९०८ या कालखंडात प्रसिद्ध करण्यात आलेले काळातील निवडक निबंधांचे दहा खंडही सरकारकडून जप्त करण्यात आले. पुढे मुंबई प्रांतातील काँग्रेस सरकारच्या सदिच्छेमुळे १९३७ साली दहावा खंड व १९४६ साली बाकीचे नऊ खंड निर्बंधमुक्त झाले आणि ही संधी घेऊन १९४६ साली सर्व खंडांचे पुनर्मुद्रणही करण्यात आले.

टिळकांच्या मृत्यूनंतर १२ ऑगस्ट १९२० रोजी शिवरामपंतांनी स्वराज्य हे नवे साप्ताहिक काढले आणि त्यातून महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळीचा पुरस्कार केला. तथापि काळाची लोकप्रियता या साप्ताहिकाला लाभली नाही. पुढे वृद्धापकाळामुळे हे साप्ताहिक त्यांनी शंकरराव देव ह्यांच्या स्वाधीन केले (१९२७). पत्रकारिता सांभाळून लोकहिताच्या चळवळींतही त्यांनी वेळोवेळी भाग घेतला. १ मे १९२२ रोजी मुळशी सत्याग्रहात ते सहभागी झाले आणि त्यासाठी त्यांनी सहा महिन्यांचा कारावासही भोगला. सायमन आयोगाला विरोध करण्यासाठी ते पुढे आले. शिवरामपंत हे जसे थोर देशभक्त तसेच एक विदग्ध पंडित आणि शैलीकार साहित्यिक होते. १९२९मध्ये बेळगाव येथे झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्याच वर्षी मधुमेहाच्या विकाराने ते पुणे येथे २७ सप्टेंबर १९२९ रोजी निधन पावले.

(साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात






# आरोग्य प्रहर

## पाण्यामुळे सुरकुतणाऱ्या बोटांचे फायदे जाणून घ्या

आपण अनेकदा पाहतो की पाण्यात बराच वेळ काम केलं किंवा पाण्यात खूप वेळ हाताची बोटे बुडवून ठेवल्यास बोटांची त्वचा सुरकुतते.बोटांवर सुरकुत्या पडल्यासारखं होतं. पण तुम्हाला माहित आहे का की याचेही काही फायदे आहेत. होय, चला जाणून घेऊयात.

पाण्यात बोटं काही वेळ ठेवल्यानंतर त्वचेवर येणाऱ्या सुरकुत्या केवळ दिसायला विचित्र नाहीत, तर त्या आपल्याला काही विशेष फायदेही देतात. खाली यापैकी काही प्रमुख फायद्यांचा उल्लेख केला आहे.



पाण्यामुळे बोटांच्या त्वचेवर तयार होणाऱ्या सुरकुत्या वस्तू पकडण्याची क्षमता सुधारतात, विशेषतः ओल्या वस्तूंना हाताळताना. या सुरकुत्यांमुळे त्वचेचा पृष्ठभाग अधिक खडबडीत होतो, ज्यामुळे ओल्या पृष्ठभागावर किंवा वस्तूंवर चांगली पकड मिळते.

सुरकुतलेली त्वचा पाण्याला बाहेर काढण्यास मदत करते. यामुळे ओल्या पृष्ठभागांवर पकड ठेवणे सोपे होते. उदाहरणार्थ, ओले दगड, भांडी किंवा कपडे हाताळताना ही प्रक्रिया उपयुक्त ठरते.

बोटं सुरकुतणे ही त्वचेची नैसर्गिक प्रतिक्रिया आहे, जी पाण्याच्या संपर्कात जास्त वेळ राहिल्यावर आपोआप घडते. या प्रक्रियेमुळे त्वचेची रचना तात्पुरती बदलते, ज्यामुळे पकडण्याची क्षमता वाढते.

भांडी घासताना: ओल्या भांड्यांवर चांगली पकड मिळवण्यासाठी सुरकुतलेली बोटं खूप उपयुक्त ठरतात. यामुळे भांडी घासणे सोपे आणि सुरक्षित होते.

कपडे धुताना: कपडे धुताना बोटांवर आलेल्या सुरकुत्यांमुळे ओले कपडे पकडणे आणि घासणे सुलभ होते.

पोहताना: नदी किंवा समुद्रात पोहताना, बोटांवरील सुरकुत्या पाण्याच्या पृष्ठभागावर किंवा दगडांवर चांगली पकड मिळवण्यास मदत करतात.

**निष्कर्ष**

बोटं सुरकुतणे ही केवळ दिसायला विचित्र वाटणारी गोष्ट नाही, तर ती मानवी उत्क्रांतीदरम्यान विकसित झालेली एक उपयुक्त प्रक्रिया आहे. यामुळे आपल्याला ओल्या वातावरणात वस्तू हाताळणे आणि पकड ठेवणे सोपे जाते. पुढच्या वेळी तुमची बोटं पाण्यात सुरकुतली, तर आश्चर्य वाटण्याऐवजी त्यामागील या फायद्यांचा विचार करा!

# आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकरांची जिल्हा रुग्णालयाला अचानक भेट




**अलिबाग : प्रतिनिधी**

आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी गुरुवारी अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाला अचानक भेट दिली, तेथील रुग्ण व्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी रुग्णाच्या नातेवाईकांनी, तसेच स्थानिक कर्यकर्त्यांनी मंत्र्यांसमोर रुग्णालयातील अव्यस्थेचा पाढाच वाचला. रुग्णालयावर कामाचा ताण असला तरी रुग्णांना चांगली आरोग्यसेवा मिळाली पाहीजे असे निर्देश त्यांनी रुग्णालय प्रशासनाला दिले.

या वेळी प्रभारी जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. निशिकांत पाटील, डॉ शितल जोशी यांच्यासह खासदार धैर्यशील पाटील, भाजपचे उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, जिल्हा सरचिटणीस महेश मोहीते, तालुकाध्यक्ष अशोक वारगे उपस्थित होते. आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दुपारी अडीच वाजता जिल्हा रुग्णालयाला अचानक भेट दिली. अपघात विभाग, डायलेसिस विभाग, क्ष किरण विभाग, सिटी स्कॅन विभाग आणि आंतररुग्ण विभागाला भेट देऊन त्यांनी रुग्णालयातील परिस्थितीचा आढावा घेतला.

यावेळी रुग्णालयातील लिफ्ट अनेक दिवसांपासून बंद असल्याने रुग्णांची मोठी गैरसोय होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. रुग्णालयात रॅम्पचे कामही अद्याप पूर्ण झाले नसल्याचेही त्यांच्या निदर्शनास आणून दिले. रुग्णांची संख्या अधिक असल्याने, रुग्णालयाची विद्यमान इमारत अपुरी पडत असल्याचे यावेळी त्यांना प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. तर नवीन इमारतीचे बांधकाम सिआरझेड क्लिअरन्स मिळाले नसल्याने ऱखडले असल्याचे सांगण्यात आले.

रुग्णालयावर कामाचा ताण असला तरी रुग्णांना चांगली आरोग्य सेवा मिळाली पाहीजे असे निर्देश त्यांनी यावेळी प्रभारी जिल्हा शल्यचिकीत्सक निशिकांत पाटील यांना दिले. तसेच रुग्णालयाची नवीन इमातरीचे काम लवकर सुरू व्हावे आणि त्यासाठी आवश्यक सिआरझेड परवानगी लवकर मिळावी यासाठी प्रयत्न केले जातील अशी ग्वाही त्यांनी या वेळी दिली.

# तळा पोलिसांतर्फे अमली पदार्थविरोधी सप्ताह जनजागृती



**तळा : प्रतिनिधी**

तळा पोलीस ठाणे अंतर्गत २६ जून अमली पदार्थविरोधी सप्ताह जनजागृती कार्यक्रमा निमीत्त तळा कला,वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय तळा तसेच अशोक लोखंडे विद्यामंदिर पिटसई, या विद्यालयांमध्ये अंमली पदार्थ विरोधी कार्यशाळा, परिसंवाद आयोजन करून जनजागृती कार्यक्रम सकाळी राबविण्यात आला.

अंमली पदार्थ विरोधी दिन सप्ताह निमित्ताने २६ जून रोजी आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त तळा पोलीस ठाणे हद्दीतील गो.म.महाविद्यालय व इंजिनिअरींग कॉलेज तळा येथे अंमली पदार्थ सेवन न करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले व अंमली पदार्थांमुळे होणारे दुष्परिणामांबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक नागरिकांची जबाबदारी व कर्तव्य याबाबतही मार्गदर्शन केले आहे.

सदर कार्यक्रमामध्ये अंमली पदार्थ विरोधी दिना बाबत माहिती मार्गदर्शन करण्यात आले, त्याच बरोबर सद्या वाढणारे सायबर क्राईम, महिलांविषयी वाढते गुन्हेगारी, डायल ११२, आणीबाणीचा प्रसंग आला तर मुलींनी सेल्फ डिफेन्स कसा करावा, तसेच पोलीस दीदी व पोलीस काका मधील नेमलेले अंमलदार यांचे मोबाईल नंबर देऊन, त्यांच्यामध्ये जनजागृती करून, त्यांना योग्य ती माहिती देण्यात आली आहे.यावेळी दोन्ही विद्यालयातील २२ शिक्षक व २७० विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# पेशवेकालीन कागदपत्रांमधून उलगडला किल्ले मानगडाचा इतिहास

**माणगाव : बातमीदार**



दुर्गदुर्गेश्वर रायगडाचा उपदुर्ग समजल्या जाणाऱ्या ऐतिहासिक किल्ले मानगडाच्या संदर्भातील पेशवेकालीन नोंदी सापडल्या असून यामुळे मानगडाच्या इतिहासाचे अनेक अपरिचित पैलू उलगडले आहेत.

पुणे पुराभिलेख कार्यालयातील मोडीलिपी कागदपत्रांमधून किल्ले मानगडावर वेताळ बुरूज, गडदचा बुरूज , सबजा बुरूज, फत्या बुरूज, नगारा बुरूज असे तब्बल चौदा बुरूजांची नावे सापडल्याने शिवकाळात टेहळणीसाठी मानगडाचे महत्व अधोरेखित झाले आहे.

पुण्यातील इतिहास अभ्यासक तसेच मोडीलिपी अभ्यासक राज उर्फ योगेंद्र मेमाणे यांनी शोधलेल्या इसवी सन १७८४ मधील या नोंदींनुसार मानगडावरील इमारती , दिवाणघर, चिरेबंदी कोठी, मोदीखाना, बंगला, तारांगणनजीकची दिंडी, कोठी आरकसी असा उल्लेखही सापडला आहे. विशेष बाब म्हणजे मानगडावरील एका पाण्याच्या टाक्याचे नाव गंगासागर असल्याची महत्वपूर्ण नोंदही आढळली आहे.

किल्ले मानगडावरील पेशवेकालीन संरक्षण व्यवस्थेमधील अधिकारी सरनोबत, सरनाईक, कारखानीस, सबनीस असे असून त्यामध्ये सरदार तुळाजीराव पासलकर, हवालदार निम्हण आणि जनार्दन गोविंद फडणीस यांची नावेसुध्दा कागदपत्रांमधून उजेडात आली आहेत.

# खात्यात बोनस जमा झाल्याने रायगडातील बळीराजा सुखावला

**मुरुड : प्रतिनिधी**

शेतकरी वर्ग पुन्हा पारंपारिक भात शेतीकडे वळविण्यासाठी शासन शेतकऱ्यांना प्रोत्साहित करीत आहे. त्यासाठी विविध कृषी योजना कार्यान्वीत होत असुन भात पिकाला हमीभाव तसेच बोनस अदा केल्यामुळे शेतकरी वर्गात आनंद व्यक्त होत आहे.

शासनाने अलिकडे भाताला हमी भाव जाहीर केल्यामुळे सावकार वा व्यापाऱ्यांच्या पिळवणूकी पासुन शेतकऱ्यांना मुक्तता होण्यास मदत झाली आहे .एकेकाळी रायगड जिल्हयाची ओळख भाताचे कोठार म्हणून होत असली तरी मध्यंतरी भात लागवड क्षेत्रात लक्षणीय घट झाली होती.

रायगड जिल्ह्यात ३५ हुन अधिक भात खरेदी केंद्र कार्यरत असुन भात विक्रीची रक्कम आता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केली जात आहे .भातावर दरवर्षी एप्रिल अखेर मिळणाऱ्या बोनसची रक्कम यंदा जून मध्ये अदा करण्यात आल्याने शेतकरी वर्गाला पेरणीच्या तोंडावर थोडा फार आर्थिक हातभार लागणार आहे.राज्य शासनाने भाताला प्रति क्विंटल रु .२३८३ इतका हमी भाव दिला असुन महायुती शासनाने आश्वासन दिल्या प्रमाणे बोनस ही दिल्यामुळे शेतकरी वर्ग आनंदी झाल्याचे तिरुपती बालाजी भात गिरणीचे मालक दिनेश मिनमिणे यांनी सांगितले .

या संदर्भात रायगड जिल्हा पणन अधिकारी के.बी. ताटे यांना विचारले असता सांगितले की,रायगड जिल्हयात ३१८२४ भात उत्पादक असुन राज्य सरकारने प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस जाहिर केला आहे .बोनस म्हणून जिल्हयात ७६ कोटी ९७ लाख रुपये मंजुर करण्यात आले आहेत. बॅक खाते पडताळणी अंती बोनस रक्कम ही वाटप करण्यात येईल.

## स्वातंत्र्यसैनिक कमलाबाई जोशी नाबाद ९८

**रोहा :** स्वातंत्र्यसैनिक श्रीमती कमलाबाई गोविंद जोशी यांनी ९७ वर्षे पूर्ण करून ९८ वर्षात पदार्पण केले आहे. त्यांचा शाल श्रीफळ आणि पुषगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी रोहे जेष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष. पी. बी. सरफळे, सचिव सुरेश मोरे, खजिनदार प्रकाश पाटील, जेष्ट नागरिक सुरेश मेहता,शैलजा देसाई, मंगेश जोशी, अरुण करंबे व स्मिता करंबे उपस्थित होते .


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलांनी मौजे – मालडुंगे ता. पनवेल जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**

**मौजे मालडुंगे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| मालडुंगे | राजेश्री महिंद्र नाईक | ८२ | २/अ/३ | पैकी ०–२५–८० ०–०२–२० | ०–४१ |
| | | | | ०–२८–०० | |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **२१ दिवसांच्या** आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा–या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोंद घ्यावी.

**दिनांक : २६/०६/२०२५**
**ठिकाण : पनवेल**

**सही/–**
**ॲड. प्रधान मधुकर पाटील**
ऑफिस नं.१३५, पहिला मजला, नगर पालिका कॉम्पलेक्स, छत्रपती शिवाजी महाराजाचा पुतळयाच्या पुढे, पनवेल,जि. रायगड–४१०२०६, मोबाईल. ९३२४३७५५०२



## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

### ई– निविदा नोटीस

मा. आयुक्त. पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती, संस्था, ठेकेदार, किंवा कंपनी यांचेकडून ई–निविदा पद्धतीने निविदा मागवीत आहेत. खालील कामाचे कोरी निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. २७/०६/२०२५ ते दि. ०४/०७/२०२५ पर्यंत दुपारी ०३.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या जाहीर ई निविदा ऑनलाईन कार्यप्रणाली व्दारे स्वीकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाबाबत तपाशील | कामची मुदत | बयाणा रक्कम | कोरी ई– निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये सखोल स्वच्छता मोहिम राबविणे (डीप क्लिनिंग) अंतर्गत साफसफाई करणेकामी मनुष्यबळ व मशिनरी पुरविणेबाबत. | ०३ वर्ष | रु.१४.१० लाख | रु.३.०००/–+१८% GST= रु.३.५४०/– |

**जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. २८९/२९२/२०२५**
**दिनांक :– २६/०६/२०२५**

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**


# रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी साधला महिलांशी संवाद

**खालापूर, चौक : प्रतिनिधी**




टाटा स्टील फाऊंडेशन यांच्या कार्यक्रमात पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी महिला भगिनी यांच्याशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि त्यांना मार्गदर्शन केले.

टाटा स्टील फाऊंडेशनने दिशा आणि रिश्ता प्रकल्पाअंतर्गत प्रशिक्षण देण्यात आलेल्या दिशा महिला आणि साथीया यांचा संवाद कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात दिशा महिला आणि साथीया यांच्यासोबत संवाद साधताना बालविवाह थांबवायचे असतील तर समाजातून प्रयत्न होणे गरजेचे आहे आणि महिलांवर अत्याचार होत असतील तर पोलिसांकडे लवकर पोहचण्यासाठी गावस्तरावर पोलीस काका आणि पोलीस दीदी यांची मदत घ्यावी असे प्रतिपादन पोलीस अधिक्षक आँचल दलाल यांनी केले.

सदर कार्यक्रमासाठी विक्रम कदम उपविभागीय पोलीस अधिकारी खालापूर, सचिन पवार पोलीस निरीक्षक खालापूर कपिल मोदी एक्झिक्युटिव्ह प्लान्ट हेड–टाटा स्टील खोपोली आणि होसुर,शशी भूषण चीफ–सी.आर. एम ऑपरेशन,सौरव शर्मा ,विनित थोरात सिक्युरिटी हेड– टाटा स्टील खोपाली यांची प्रमुख उपस्थिती होती.


## जाहीर नोटीस

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**अर्ज क्रमांक : MACP ७५९/२०२४**

**दुर्गावतीदेवी सुभेदार मौर्य आणि इतर ३** — **अर्जदार**
**विरूद्ध**
**संजय बालचंद्र कोळी** — **विरूद्ध पक्षकार**
**आणि**
**रॉयल सुंदरम इन्शु.कंपनी लिमिटेड** — **विमाकार**

**प्रति,**
**संजय बालचंद्र कोळी**
**पत्ता–** घर क्र. २७८, कांबड, भुजे, तारघर पीओ विवा ता. पनवेल जि. रायगड ४१० २०६.
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **२४–०७–२०२५** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **सदस्य श्रीमती पटवारी रोहिणी राजेंद्र** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस दिनांक **१०–०६–२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
सदस्य
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१



## ग्रुप ग्रामपंचयात चिपळे

**जाहीर दरपत्रक व सूचना**

ग्रामपंचायत चिपळेसाठी २०२५/२६ या सालाकरिता ग्रामपंचायत फंडातून मौजे चिपळे, भोकरपाडा, विहीघर, कोप्रोली या गावातील सर्व गृहनिर्माण सोसायटीमधील व गावातील कचरा उचलण्यासाठी ठेकेदाराची आवश्यकता आहे. सदरची निविदा ही ६ महिन्यांसाठी मागविण्यात येत आहे. त्यासाठी मान्यताप्राप्त निविदा धारकांकडून दि.२३/०६/२०२५ ते दि. ३०/०६/२०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफामध्ये जाहिरदर पत्रक मागविण्यात येत आहेत. सदरचे दरपत्रक दि.०१/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदाधारक अगर त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**अटी व शर्ती :–**

१. ग्रामपंचायत हद्दीतील मौजे चिपळे, भोकरपाडा, बोनशेत, विहीघर, कोप्रोली या गावातील सर्व गृहनिर्माण सोसायटीमधील कचरा उचलण्यात यावा.
२. सदर निविदाधारकाने सर्व गावांचा कचरा टाकण्यासाठी स्वतः डम्पींग ग्राउंडची व्यवस्था करण्यात यावी.
३. निविदाधारकांनी तयार केलेल्या डम्पींग ग्राउंडमध्ये सर्व गृहनिर्माण सोसायटीसह गावातील कचरा टाकण्यात येईल.
४. कचरा उचलण्यासाठी लागणारे वाहने, मनुष्यबळ, इंधन, जेसीपी याची सर्व जबाबदारी निविदाधारकाची असेल.
५. डम्पिंग ग्राउंडमधून कचरा उचलून जात असतांना काही कायदेशीर बाबी निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
६. कचरा उचलण्यासाठी २ दिवसांचा विलंब झाला तर कायदेशीर व दंडात्माक कारवाई करण्यात येईल.
७. दर महिन्याचे पेमेंट ४५ दिवसानंतर देण्यात येईल,

**ठिकाण : चिपळे**
**दिनांक : २५/०६/२०२५**

**सही/–**
**श्री. जनार्दन पोपट सरडे**
ग्रामपंचयात अधिकारी
ग्रुप ग्रामपंचयात चिपळे
ता. पनवेल, जि. रायगड

**सही/–**
**श्रीम. वैशाली रामचंद्र वैदु**
प्रशासक
ग्रुप ग्रामपंचयात चिपळे
ता. पनवेल, जि. रायगड



## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ — फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२– २७४५२३३९ — उपायुक्त कार्यालय : ०२२– २७४५५७५१
ई–मेल : panvelcorporation@gmail.com — वेबसाईट: www.panvelcorporation.com

### जाहिर सूचना

पनवेल महानगरपालिकेमार्फत खालील बाबींकरीता जाहीर दरपत्रके सिलबंद लिफाफ्यात मागवित आहेत.
**कामाचे नाव** :– पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये पर्यावरण गणेशोत्सव २०२५ साजरा करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रातील गणेश मूर्तिकारांना शाडूची माती उपलब्ध करून देणेबाबत.

| अ.क्र. | कामाचे तपाशिल | कामाचा कालावधी | दर ( GST व इतर सर्व प्रचलित करांसहित) |
|---|---|---|---|
| १. | • ३४ टन शुध्द शाडूच्या मातीचा पुरवठा करणे.<br>• शाडूच्या मातीचे वजन प्रति बंग ३५ किलोग्रॅम किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.<br>• शुध्द शाडूच्या माती बॅगचा पनवेल महानगरपालिका हद्दीत मूर्तिकारांच्या कारखान्याच्या ठिकाणी पोहोच / पुरवठा करणे.<br>• शाडू माती गणेश मूर्ती बनवण्यासाठी योग्य असणे आवश्यक आहे.<br>• शाडू मातीचा पुरवठा दर हा शाडू माती बॅग मूर्तिकारांच्या कारखान्यात पोहच दर, वाहतूक खर्च, बॅग वाहनात भरणे व उतरणे मजुरी दर सह GST व इतर सर्व प्रचलित करांसहित असावा. | १५ दिवस | |

सदरची दरपत्रके कार्यालयीन वेळेत दिनांक ०४/०७/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका पर्यावरण विभागात सादर करावीत.
सदरची दरपत्रके ही कार्यालयीन वेळेत दिनांक ०७/०७/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता उपायुक्त, पर्यावरण विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे दालनात उघडण्यात येतील.

१. उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२. कोणतेही दरपत्रक नाकारण्याचा अधिकार पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

**जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. २८८/२९१/२०२५**
**दिनांक :– २६/०६/२०२५**

**सही/–**
**उपायुक्त (पार्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**

# डॉ. आंबेडकर स्मारकात पदविका अभ्यासक्रम

## नवी मुंबई महापालिका आणि मुंबई विद्यापीठाचा सामंजस्य करार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे तेथे सातत्याने होणा–या विविध उपक्रमांमुळे 'ज्ञानस्मारक' म्हणून नावाजले जात आहे. या स्मारकातून बाबासाहेबांच्या ग्रंथवाचनाप्रमाणेच युवा अभ्यासकही तयार व्हावेत या भूमिकेतून नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर थॉट्स' या विषयावर पदव्युत्तर पदवी नंतरचा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम सुरू करणेबाबतचा सामंजस्य करार मुंबई विद्यापीठासोबत राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीदिन अर्थात सामाजिक न्याय दिनाच्या पूर्वसंध्येला मुंबई विद्यापीठाच्या सभागृहात करण्यात आला. महापालिकेच्यावतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे तसेच मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.रविंद्र कुलकर्णी यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.



मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.रविंद्र कुलकर्णी यांनी हा पदविका अभ्यासक्रम ही एक सुरूवात असून यापुढील काळात सामाजिक न्याय, पालीभाषा व अशा प्रकारचे इतरही अभ्यासक्रम याठिकाणी सुरू करण्यात येतील असे सांगितले. लवकरच स्मारकामध्ये मुंबई विद्यापीठाच्या सहयोगाने संशोधन केंद्र सुरू करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. विद्यापीठाचे निबंधक डॉ. प्रकाश कारंडे यांनी नवी मुंबई महानगरपालिकेसोबत झालेला हा सामंजस्य करार विद्यापीठाच्या कामकाजातील सर्वात कमी वेळेत झालेला करार असल्याचे प्राधान्याने नोंदविले.

मुंबई विद्यापीठाच्या माध्यमातून नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली सेक्टर १५ येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकात 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर थॉट्स' या विषयावर पदव्युत्तर पदवीनंतरचा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम १ जुलै २०२५ पासून सुरू होत असून यामुळे स्मारकाच्या नावलौकिकात अधिकच भर पडलेली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे अभ्यासकांसाठी ग्रंथसंपदा व ई–लायब्ररीच्या माध्यमातून अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देणारे अभ्यासकेंद्र म्हणून ३ वर्षांच्या कालावधीतच नावाजले जात आहे. तथापि यापुढील काळात या स्मारकाचा उपयोग अभ्यासकांप्रमाणेच जनसामान्यांना व्हावा ही आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांची भूमिका असून त्याठिकाणी सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण, कामगारांचे सबलीकरण, बालकांचे हक्क अशाप्रकारे उपक्रम राबविण्याचे नियोजन केले जात आहे. हा पदविका अभ्यासक्रम हे याच उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने उचललेले पाऊल आहे अशी भावना आयुक्तांनी यावेळी व्यक्त केली.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या विभागप्रमुख उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, सल्लागार संध्या अंबादे. विद्यापीठाचे उपकुलपती प्राचार्य डॉ.अजय भामरे, निबंधक डॉ. प्रकाश कारंडे, डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र मुंबई विद्यापीठाच्या विभागप्रमुख डॉ मनीषा करणे उपस्थित होते

# परिवहन कार्यालयात कामकाजाचा खोळंबा; मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्यातील अनेक परिवहन कार्यालयांमध्ये सध्या वरिष्ठ अधिकारी दोन दोन पदांवर कार्यरत असल्याची माहिती वेळोवेळी पुढे येत आहे. अधिकाऱ्यांच्या वारंवार अनुपस्थितीमुळे कामकाज प्रलंबित राहत आहे. साहेबांची सही नाही या कारणास्तव सामान्य नागरिकांचे तसेच परवाना, ट्रान्सफर, परमिट आदी कामांसाठी आलेल्या एजंट व चालक बांधवांचे प्रचंड हाल होत असल्याची तक्रार नवी मुंबईतील सारथी सुरक्षा सेवेचे सरचिटणीस विनय मोरे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

एकच अधिकारी दोन पदभार सांभाळत असल्याने समस्यांचा भडका उडत आहे. कामांचा खोळंबा होऊन कामांमध्ये अनावश्यक विलंब होतो.नागरिकांना अनेकवेळा कार्यालयात फेऱ्या माराव्या लागतात. याच गैरसोयीचा गैरफायदा घेत दलालगिरीला उत्तेजन मिळते. काही ठिकाणी चर्चेत असलेली गोष्ट म्हणजे काही अधिकारी आपल्या सेवानिवृत्तीच्या शेवटच्या टप्प्यावर भ्रष्टाचाराच्या सापळ्यात अडकू नये म्हणून खुर्चीवर न बसता अनुपस्थित राहतात.

ही स्थिती प्रशासनाच्या प्रतिमेला धक्का देणारी आहे व जनतेमध्ये शासनाविषयी नाराजीचे वातावरण निर्माण करत आहे. साहेब कार्यालयातच नाहीत हे उत्तर किती वेळा ऐकावे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. शासनानेच जनतेसाठी सेवा सुविधा सुरू केल्या आहेत, परंतु त्या सेवेच्या अंमलबजावणीत जर अधिकारीच अनुपस्थित राहत असतील तर सुलभ कारभाराची व्याख्या नावालाच उरते अशी खंत मोरेंनी व्यक्त केली.

### 'त्या' अधिकाऱ्यांना पदमुक्त करा!

अशा अधिकाऱ्यांना पदमुक्त करून त्यांच्या जागी कर्तव्यदक्ष अधिकारी त्वरित नेमावेत.अशा पदांवर जर अधिकारी उपलब्ध नसेल तर ते पद रद्द करून त्यांच्या खालच्या पदावरील पात्र अधिकाऱ्यांकडे सर्वाधिकार सोपवावेत. प्रत्येक परिवहन कार्यालयात अधिकारी उपस्थित राहून जनतेच्या समस्या त्वरित सोडवतील यासाठी डेली अटेन्डन्स व फिजिकल व्हिजिबिलिटी रिपोर्ट सक्तीने ठेवण्यात यावा. नागरिकांना कामाचा कालबद्ध निकाल मिळेल यासाठी 'वन टाईम सिग्नेचर अथॉरिटी' प्रणाली तात्काळ लागू करावी.

# ब्लॅक बेल्ट, डिग्री, कराटे सर्टिफिकेट वाटप



**उरण : बातमीदार**

शोतोकोन कराटे टू स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या मान्यतेने जेएनपीटी टाऊनशिप येथे ब्लॅक बेल्ट, डिग्री सर्टिफिकेट अवॉर्ड तसेच कराटे बेल्ट एक्झाम सर्टिफिकेट वाटप करण्यात आले.

या वेळी महाराष्ट्र प्रेसिडेंट विकास भोईर व दीपक घरत यांना फोर्थ डिग्री ब्लॅक बेल्ट देऊन गौरवण्यात आले. त्याचप्रमाणे अजय तांडेल, प्रगती घरत, सोनल तांडेल, मिलन जाधव व किरण हर्गीवाड यांना सेकंड डिग्री ब्लॅक बेल्ट देऊन व अथर्व कडू, साईराज कडू, आशीर्वाद सिंग, ओंकार माने, सचिन गावंड यांना फर्स्ट डिग्री ब्लॅक बेल्ट देऊन गौरवण्यात आले. एकूण ६६ मुलांना विविध कॅटेगिरीमध्ये कलर बेल्ट एक्झॅम सर्टिफिकेट देण्यात आले.

माजी जि.प. सदस्य विजय भोईर यांनी सर्वांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# 'विचारवेध'मधून राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तित्वातील विविध पैलूंचे दर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या समाजविकास विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून २४ जून रोजी 'विचारवेध' या व्याख्यान शृंखलेमध्ये सुप्रसिध्द व्याख्याते प्रा.गोपाल गुरू यांचे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षणविषयक आधुनिक दृष्टिकोन' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले.




अतिशय अभ्यासपूर्ण विवेचनात त्यांनी छत्रपती शाहू महाराजांचे स्वाभिमानी नेतृत्व, बुद्धिप्रामाण्यवाद, रयतेवर आईसमान प्रेम करणारा राजा, कृषी विषयक धोरण, महिलांसंबंधीचे धोरण, वैज्ञानिक दृष्टिकोन व धार्मिक दृष्टीकोन, जाती व्यवस्था, शिक्षणाचे महत्व असे विविध पैलू उलगडून सांगितले. यावेळी प्रा.गोपाल गुरू यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची पाहणी करून या वास्तूची रचना, ग्रंथालय, छायाचित्र संग्रहालय, ध्यान केंद्र व स्वच्छता आणि टापटीप यांचे भरभरून कौतुक केले.

याप्रसंगी उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, माजी महापौर सुधाकर सोनावणे, माजी नगरसेवक संजू वाडे व मोठ्या संख्यने श्रोतृवर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नमुंमपा समुह संघटक संतोष मोरे यांनी केले.

# नवी मुंबईत आणीबाणीच्या कालखंडाविषयी विविध उपक्रमांतून लोकशाहीचा जागर

**नवी मुंबई : बातमीदार**

लोकशाहीत प्रशासन जितके मजबूत तितकी लोकशाही समर्थ राहील. त्यामुळे सर्वांचीच जबाबदारी मोठी असल्याचे सांगत इतिहासात जे काही वाईट घडले त्याचे स्मरण ठेवून पुन्हा तशा गोष्टी घडू नयेत याकरिता आपण सर्वांनी जागरुक व्हावे यादृष्टीने आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण होत असताना विविध कार्यक्रम करण्याची संकल्पना पंतप्रधान महोदयांनी मांडली अशा शब्दात महाराष्ट्र राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संविधान हे आपल्याला जगण्याची मूल्ये शिकवते व कर्तव्याचे भान देते, त्यामुळे त्याचा जीवनात अंगिकार करावा असेही त्यांनी प्रतिपादन केले.

भारतात २५ जून १९७५ रोजी आणीबाणी लागू झाली त्या घटनेला ५० वर्षे पूर्ण होत असताना केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार सर्वत्र विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्यास अनुसरून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात आयोजित विशेष कार्यक्रमाप्रसंगी ते मनोगत व्यक्त करीत होते.

आमदार मंदा म्हात्रे यांनी यावेळी बोलताना कार्यक्रमाला विदयार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती पाहून समाधान व्यक्त करीत देशाच्या भविष्यातील नागरिकांना इतिहासातील घटनांची माहिती मिळून लोकशाहीचे व संविधानाचे महत्व त्यांच्या मनात रुजवण्यासाठी हा कार्यक्रम महत्वाचे असल्याचे सांगितले.महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे* यांनी संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार जगण्यासाठी किती महत्वाचे असतात याबाबत समाज प्रबोधन व्हावे यादृष्टीने आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण होत असताना केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशानुसार आयोजित केला जाणारा कार्यक्रम लोकशाहीचे महत्व अधोरेखित करणारा असल्याचे मत व्यक्त केले.

या निमित्त विष्णुदास भावे नाट्यगृहाच्या भव्यतम पॅसेजमध्ये प्रदर्शित करण्यात आलेल्या आणीबाणीविषयक छायाचित्र प्रदर्शनाचा शुभारंभ वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रदर्शनामध्ये भारतात प्राचीन काळापासून सुरु असलेल्या लोकशाही व्यवस्थेची चित्रांकित माहिती तसेच आणीबाणीच्या काळातील घडामोडी आणि लोकशाही रक्षणासाठी लढणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाची माहिती आहे. त्याचप्रमाणे लोकशाहीच्या सबलीकरणासाठी सरकारमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी उपक्रम, योजना यांचीही माहिती प्रदर्शित करण्यात आली आहे.





**पनवेल : चिपळाई ग्रुप चिपळे, भाजप चिपळे तसेच युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांच्या माध्यमातून गणपती घाट, स्मशानभूमी, नदी येथे फळझाडांची लागवड करण्यात आली. भाजप चिपळे बूथ अध्यक्ष समीर पाटील, शशिकांत फडके, ॲड. रोहित पाटील, सुभाष पाटील, धर्मेंद्र भगत, विशाल पाटील, समीर पद्माकर पाटील, किरण पाटील, विजय पाटील उपस्थित होते.**



**खांदा कॉलनी : भाजप नवीन पनवेल शहर मंडळ आणि आनंदी ग्रुप यांच्या वतीने योग दिन साजरा करण्यात आला. या वेळी भाजप नवीन पनवेल शहर मंडळ दशरथ म्हात्रे, सरचिटणीस भीमराव पोवार, अरुण म्हसकर, विश्राम एकांबे, रमाकांत भगत, रामदास गोवारी, संजय पाटील, रघुनाथ सावंत, संजय धानोरकर, प्रमोद भोईर, प्रमोद बेर्डे, बाबाजी चव्हाण, श्री. नेवारे, उमेश मांजरेकर, श्री. तपासे, श्री. वाकडीकर, श्री. विन्हेरकर, प्रकाश शेळके, थोरात उपस्थित होते.**

# वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वस्तूंचे वाटप

**उरण : वार्ताहर**

श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण, केअर नेचर सामाजिक संस्था वेश्वी, जायंटस ग्रुप ऑफ उरण यांच्या संयुक्त विद्यमानाने सामाजिक कार्यकर्त्या संगीता सचिन ढेर यांचे सुपुत्र नचिकेत सचिन ढेरे यांच्या वाढदिवसानिमित्त केळ्याचा माळ चिरनेर, आर झेडपी शाळा बांधिलवाडी, रा.जि.प.आदिवासी कोरळवाडी शाळा, भानूबेन प्रवीण शहा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तारा, ता. पनवेल येथे नचिकेत च्या वाढदिवसाचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय वस्तू, छत्री व डाबर इंडिया कंपनी चे ज्यूस व जीवनावश्यक वस्तू यांचे वाटप करण्यात आले.

# विकास आराखड्यात सुपर स्पेशलिटी रुग्णालयाचा समावेश

## आमदार मंदा म्हात्रेंच्या पाठपुराव्याला यश

**नवी मुंबई : बातमीदार**

आजही सर्व सामान्य व गरजू रुग्णांना आरोग्य सेवा मिळण्यासाठी अनंत अडचणींना सामोरे जावे लागत होते. बुद्धीमत्ता असूनही तरुणांना व तरुणींना डॉक्टरकी मिळण्यापासून वंचित राहावे लागत होते. याचा गंभीर विचार बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी केला होता. त्याचं अनुषंगाने आमदार मंदा म्हात्रे यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजसाठी शासन दरबारी सतत पाठपुरावा केला होता.

या प्रयत्नांना यश प्राप्त झाले असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेज मंजूर झाल्याने नवी मुंबईकरांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. त्यामुळे आमदार मंदात म्हात्रे यांनी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले.

यानिमित्त बुधवारी भारतीय जनता पार्टी, नवी मुंबई जिल्ह्याच्यावतीने डॉ. राजेश पाटील यांच्या नेतृत्वात



नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या दालनात बैठक घेऊन रुग्णालय तसेच मतदारसंघातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

आमदार म्हात्रे यांनी सांगितले की, विकास कामा बरोबरच नवी मुंबईतील तरुणांना व खेळाडूंना आधुनिक क्रीडा व मनोरंजनासाठी सुविधा उपलब्ध व्हावे म्हणून अनेक वर्षापासून महापालिकेकडे पाठपुरावा करीत होती. बेलापूर गाव येथील कुस्तीच्या मैदानावर आधुनिक क्रीडा संकुल उभारणे, सीबीडी से–३ राजीव गांधी मैदानालगत सुविधायुक्त इनडोअर स्पोर्ट इमारत बांधणे, नेरूळ से–९, भू.क्र.१२१ बी, आचार्य तुळशी मैदानात आधुनिक क्रीडा सुविधा निर्माण करणे, वाशी, से–१०ए, भू.क्र ११ व १२ येथे विविध खेळांचे आधुनिक क्रीडा सुविधा निर्माण करणे या सर्व सुविधा उपलब्ध होणार असल्याने नवी मुंबईतील तरुणांना व खेळाडूंना एक महत्वपूर्ण क्रीडा व्यासपीठ निर्माण होणार आहे. नवी मुंबईतील एखादा खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर निवड होऊन आपल्या नवी मुंबईचे प्रतिनिधित्व करील

तसेच सामाजिक न्याय, महिलांच्या सक्षमीकरण व राष्ट्रनिर्मितीसाठी अमूल्य योगदान देणाऱ्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब व राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे पूर्णाकृती पुतळे उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. या थोर विभूतींचे कार्य जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच नव्या पिढीला प्रेरणा देणाऱ्या स्वरूपात त्यांच्या पुतळ्यांची उभारणीकरिता जागा उपलब्ध करून देण्यात यावी याबाबत हि आमदार मंदाताई म्हात्रे यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना निवेदन देऊन मागणी केली आहे.

तसेच ज्वेल ऑफ नवी मुंबई मध्ये उभारण्यात येणाऱ्या भगवान गौतम बुद्धाचा पुतळ्याचे काम अंतिम टप्यात असून त्याचे हि उद्घाटन लवकरात लवकर होणार असल्याचे आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले. पामबीच लगत असेलेल्या मोकळ्या भूखंडावर फुलपाखरू उद्यान (बटरफ्लाय गार्डन) उभारणे, उरण फाटा आदिवासी बांधवांना पक्की घरे बांधणे, सीबीडी से–१ येथे वाचनालय बांधणे, शहाबाज गाव फणसपाडा गावातील नागरिकांना समाज मंदिर सभागृह बांधणे, सारसोळे गावातील से–६ येथील लोकमान्य टिळक समाज मंदिर सभागृह पूर्ववत करणे, वाशी से–१० ए मिनीसिशोर व सागर विहार परिसर विकसित करणे अशा अनेक विविध प्रश्न व समस्या आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी ऐकून घेतल्या. भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पत्राद्वारे उपस्थित केलेल्या समस्यांवर आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सकारात्मकता दाखवत तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनीद्वारे आदेश दिले



# श्रीवर्धन, म्हसळ्यात गुटखा विक्री सुरूच

**श्रीवर्धन : बातमीदार, प्रतिनिधी**

श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यात वर्तमानपत्रांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतरसुद्धा गुटख्याची विक्री जोमाने सुरू असल्याचे पहायला मिळत आहे.

आता गुटख्याच्या विक्रीमध्ये १० रुपयांची वाढ करण्यात आलेली आहे. त्यामुळे गुटखा विक्री करणारे व दुकानदारांना गुटखा पुरविणारे यांना डबल फायदा होत असल्याचे दिसून येत आहे. शासनाने गुटख्यावर बंदी घातलेली असूनसुद्धा विमल नावाचा गुटखा, पान मसाला आणि तंबाखूची पुडीसोबत विकला जात आहे, तर आरएमडी गुटख्याची विक्री त्यापेक्षाही जास्त चढ्या भावाने केली जात आहे.

सर्वत्र खुलेआम मिळत असलेल्या गुटख्यामुळे तरुण पिढी या व्यसनाच्या अधीन झाल्याचे पहायला मिळत आहे. काही ठिकाणी महिलादेखील गुटख्याच्या व्यसनामध्ये अधीन झाल्याचे दिसून येत आहे. या अगोदर श्रीवर्धन तालुक्यात गुटखा विक्री करणाऱ्या काही दुकानदारांवर कारवाई करण्यात आली होती, पण फुटकळ विक्री करणाऱ्या गुटखा विक्रेत्यांवर कारवाई करून काहीही साध्य होणार नाही, कारण श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यात गुटख्याचा खूप मोठ्या प्रमाणावर साठा करून सर्व दुकानदारांना ते पुरवणाऱ्यांची टोळी अस्तित्वात आहे.

शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील दुकानदारांना गुटखा पुरविण्यात येत आहे. यामुळे गुटखा विक्रीचे लोण आता खेडेगावातदेखील पोहचल्याचे पहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी गुटख्याच्या पुड्या उघड्या न देता त्या कागदामध्ये पुडी बांधून देण्यात येत आहेत. गुटखाबंदी सक्तीने लागू करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडे जर का अधिकारी व कर्मचारी यांची कमतरता असेल तर तसा अहवाल त्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना सादर करावा. अन्न व औषध प्रशासनाने गुटख्याचा साठा करून सर्व दुकानदारांना पुरवणाऱ्या व्यक्तींवर कारवाई केली नाही, तर श्रीवर्धनमधून जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.



### खालापुरात फार्महाऊसवर गुटखा जप्त

*खालापूर : अन्न व औषध प्रशासन विभाग पेण यांनी खोपोली हद्दीमध्ये साजगाव येथील महडकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असणाऱ्या फॉर्महाऊसवर छापा टाकून ६५ हजारांचा विमल कंपनीचा गुटखा जप्त केला. या वेळी तेथे देखरेखीसाठी असलेला चौकीदार व त्याचे अन्य साथीदार सुगावा लागताच त्या ठिकाणावरून पळून गेले. खोपोली पोलीस व अन्न व औषध प्रशासन अधिकारी यांनी सरकारी पंच व फॉर्महाऊस मालक यांना सोबत घेऊन कारवाई केली. या वेळी रूममधील झडती घेतली असता जवळपास ६५ हजारांचा विमल गुटखा मिळून आला. सोबत आरोपींचे दोन मोबाईल व दोनचाकी स्कुटी ताब्यात घेण्यात आल्या असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईवेळी अन्न व औषध प्रशासन अधिकारी विक्रम निकम, खोपोली पोलीस अधिकारी अभिजीत होरांबळे, प्रशांत पाटील, समीर पवार, चव्हाण, रामा मासाळ, आकाश डोंगरे, किरण देवकते, अमोल कुंभार, राहुल चौगुले उपस्थित होते.*

# माथेरानमध्ये पर्यटकांच्या सोयी सुविधांसाठी स्थानिकांचे श्रमदान

**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळ हे संपूर्णतः पर्यटनावर अवलंबून आहे. या पर्यटनस्थळावर येणाऱ्या पर्यटकांना योग्य सोयी सुविधा मिळाव्यात याकरिता येथील प्रशासनाबरोबर स्थानिक मंडळीदेखील नेहमीच अग्रेसर असते. येथे येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांसाठी वाहनतळ अपुरे पडत असल्याने स्थानिकांनी वाहनतळातील काही भागात श्रमदान करून पार्किंगसाठी जागा उपलब्ध केली आहे.

माथेरान पर्यटनस्थळी पावसाळी पर्यटन हंगामात पर्यटकांची जणू जत्राच असते. पावसाळी विकेंडला येथील वाहनतळ पार्किंगसाठी अपुरे पडते. यामुळे घाट रस्त्यात वाहने उभी करावी लागत असून घाटात शनिवार व रविवार या दोन दिवसांत वाहतूक कोंडी होते आणि मग याचा नाहक त्रास सगळ्यांना सहन करावा लागतो.

मागील काही वर्षांपासून पावसाळी पर्यटन हंगामात असा प्रकार सातत्याने घडू लागला असून येथील प्रशासनाला हा गंभीर प्रश्न सतावत होता. यावर स्थानिकांनी एकत्रित येऊन मंगळवारी वाहनतळ परिसरातील काही भागात श्रमदान करून गाडी पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. अंदाजे शंभर ते दीडशे वाहने या ठिकाणी उभी केली जाऊ शकतात.

माथेरान पर्यटनस्थळी येणाऱ्या पर्यटकांच्या सोयी सुविधांसाठी येथील सर्व राजकीय मंडळींनी स्थानिकांनी एकत्रित घेऊन वाहनतळातील रस्त्यावर श्रमदान करून वाहने उभी करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. याबाबत स्थानिक प्रशासनानेदेखील सर्व गावकऱ्यांचे आभार मानले आहेत.



**माथेरान वाहनतळ विकेंडला फुल्ल होत असल्यामुळे घाटात वाहतूक कोंडी होत होती. वाहनतळातील काही भागात स्थानिकांनी श्रमदान करून गाड्या पार्किंगसाठी जागा उपलब्ध केली आहे. नगरपालिकेतर्फे सर्व गावकऱ्यांचे कौतुक करतो. आता या भागात पथदिवे आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सुसज्ज पार्किंग सुरू केली जाईल.**

**–राहुल इंगळे, मुख्याधिकारी तथा प्रशासक, माथेरान**

# अलिबाग लायन्स क्लब अध्यक्षपदी प्रदीप नाईक

**अलिबाग : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ अलिबागच्या अध्यक्षपदी अध्यक्षपदी प्रदीप नाईक यांची निवड करण्यात आली. सेक्रेटरीपदी महेश कवळे, खजिनदारपदी अमोघ किंजवडेकर, तर प्रथम उपाध्यक्षपदी महेश चव्हाण यांची निवड करण्यात आली. यांना आपल्या पदाची शपथ देण्यात आली.



लायन्स क्लब ऑफ अलिबागचा इंडक्शन आणि इन्स्टॉलेशन समारंभ क्षात्रैक्य समाज सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या समारंभात नवनियुक्त लायन्स पदाधिकाऱ्यांना आपल्या कार्यकर्तृत्वाची शपथ देण्यात आली. लायन्स क्लब इंटरनॅशनलचे पदाधिकारी सीए लायन के.एल. परमार, फर्स्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन प्रवीण सरनाईक, पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन अनिल जाधव उपस्थित होते. या वेळी अलिबाग डायमंड अध्यक्ष श्रुती सरनाईक, लिओ लायन अध्यक्ष ओमकार मालपाणी यांच्यासह क्लबमधील इतर पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत शपथग्रहण सोहळा झाला. १० नवीन लायन मेंबर्सचेही इन्स्टॉलेशन करण्यात आले.

रिजन चेअरपर्सन गिरीश म्हात्रे, विजय वनगे, झोन चेअरपर्सन विकास पाटील, डिस्ट्रिक्ट कोऑर्डिनेटर अनिल म्हात्रे, नयन कवळे, प्रियदर्शनी पाटील, मावळत्या अध्यक्ष गौरी म्हात्रे, अंकिता पाटील, शिल्पा कवळे, डॉ. रेखा म्हात्रे, अविनाश राऊळ, रमेश धनावडे, नितीन शेडगे, नितीन अधिकारी, रोहन पाटील, महेंद्र पाटील, संतोष पाटील, डॉ चंद्रकांत वाजे, श्रीकांत ओसवाल, अनिल आगाशे, परेश भतेजा, अभिजित आमले, रणजित जैन, विद्या अधिकारी, अतुल वर्तक, सीमा शेडगे, संतोष सागवेकर यांच्यासह अलिबाग क्लबचा भव्य लायन परिवार, अलिबाग डायमंड्स, नागाव, किहीम, पोयनाड, मुरुड आणि इतर लायन्स क्लब पदाधिकाऱ्यांसह दोनशेहून अधिक लायन्स या वेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी आगाशे आणि अपर्णा पाटील यांनी केले.

# राधिका गारमेंट मॅन्यूफॅक्चरिंग युनिटचे उद्घाटन

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथे विश्वरूप प्रतिष्ठान संचलित राधिका गारमेंट मॅन्यूफॅक्चरिंग युनिटचे उद्घाटन भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आले.

या कार्यक्रमास खासदार धैर्यशील पाटील, विश्वरूप प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा व भाजप जिल्हा सरचिटणीस सतिश धारप, प्रतिष्ठानच्या अध्यक्ष रोहिणी धारप, प्रकल्प संचालक मिनल बुटाला, मुख्य कार्यकारी अधिकारी अथर्व धारप, आशिष धारप, भाजप नेते आस्वाद पाटील, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष डॉ. मंजुषा कुद्रीमोती, रजिपच्या माजी अध्यक्ष नीलिमा पाटील, जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, सोपान जांबेकर, श्रेया कुंटे, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष शर्मिला पाटील, पेण नगराध्यक्ष प्रितम पाटील, माजी जिल्हाध्यक्ष हेमा मानकर, सोशल मीडिया सहसंयोजक प्रियांका पिंपळे, रोहा तालुकाध्यक्ष महेश ठाकूर, सरचिटणीस एकनाथ ठाकूर, आनंद लाड, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष अपर्णा सुटे, अशोक अहिरे, धनराज उमाळे, ज्ञानेश्वर शिर्के आदी उपस्थित होते.



या वेळी राधिका गारमेंट युनिटला विश्वरूप प्रतिष्ठानकडून १० शिलाई मशीन देण्यात आल्या.

# कर्जतचे पत्रकार श्रीराम पुरोहित यांना पुरस्कार जाहीर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील ज्येष्ठ पत्रकार, कीर्तनकार, प्रवचनकार, व्याख्याते, आंतरराष्ट्रीय विषयांचे अभ्यासक आणि शिक्षणतज्ज्ञ श्रीराम अनंत पुरोहित यांना विश्व संवाद केंद्र या संस्थेच्या वतीने देवर्षी नारद पत्रकारिता सन्मान पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. प्रिंट मीडिया क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे.



रत्नागिरी येथील माळनाका परिसरामधील शिर्के विद्यालयातील रंजन मंदिर सभागृहात २८ जून रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजिण्यात आलेल्या विशेष समारंभात निवृत्त एअर मार्शल हेमंत भागवत यांच्या हस्ते श्रीराम पुरोहित यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती देवर्षी नारद सन्मान पुरस्कार समितीचे समन्वयक डॉ. निशीथ भांडारकर यांनी दिली.

या पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत नाहीत आणि निवड समिती हीच पुरस्कारार्थींची निवड करते, असे विश्व संवाद केंद्र, मुंबईचे अध्यक्ष सुधीर जोगळेकर यांनी सांगितले. मूल्याधिष्ठित पत्रकारिता करणाऱ्या आणि विशुद्ध चरित्राच्या पत्रकारांना हा पुरस्कार प्रदान केला जातो.

# बेशिस्त वाहनचालकांनी नाकाबंदीचा घेतला धसका

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात वाहतूक शिस्तीचा भंग रोखण्यासाठी आणि बेकायदेशीर वाहनधारकांवर कारवाई करण्याच्या उद्देशाने माणगाव पोलीस आणि वाहतूक विभागाने संयुक्तरित्या विशेष मोहीम राबवून शहरात माणगाव– पुणे या महत्त्वाच्या मार्गावर तसेच ठिकठिकाणी नाकाबंदी केली. या नाकाबंदीमुळे वाहनचालकांमध्ये खळबळ उडाली असून नियम न पाळणाऱ्यांवर थेट दंडात्मक कारवाई करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून माणगाव शहरात नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहनधारकांची संख्या वाढल्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती. हेल्मेट न वापरणे, गाडीचे विविध कागदपत्रे तसेच प्रदूषण प्रमाणपत्र नसणे, अवैध नंबर प्लेट्स, सीटबेल्ट न लावणे, नंबर प्लेट तुटलेली वाहने, काळी काच असणारी वाहने, लायसन्स नसणे, ट्रिपल सीट बाईकस्वार, बुलेट, वाहनाच्या सायरनचा कर्कश आवाज असणाऱ्या वाहनचालकांवर, वाहनांची विविध कागदपत्रांची अपूर्णता अशा विविध कारणांमुळे अपघातांची शक्यता वाढत होती. या पार्श्वभूमीवर माणगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि वाहतूक विभागाने संयुक्तपणे पुढाकार घेत नाकाबंदी मोहीम हाती घेतली. या कारवाईत दररोज सकाळी व सायंकाळी शहरातील मुख्य चौक व बाजारपेठ गर्दीची ठिकाणे, एसटी बस स्थानक, महाविद्यालय परिसर, मोकळ्या जागा आणि महामार्गावर तपासणी केंद्र उभारण्यात आली. या तपासणीत शेकडो दुचाकी व चारचाकी वाहनांची तपासणी करण्यात आली. अनेक वाहनांवर कागदपत्रे नसल्यामुळे दंड आकारण्यात आला.



माणगाव पोलीस व वाहतूक पोलीस विभागाची संयुक्त कारवाई

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्या आदेशाने तसेच माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी नियोजन करून माणगाव पोलीस ठाण्याचे कर्मचारी तसेच वाहतूक पोलीस कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबविण्यात आली. विविध वाहनांची तपासणी करणारी नाकाबंदी फक्त एका दिवसापुरती नसून वाहतूक शिस्त पुन्हा प्रस्थापित होईपर्यंत सुरू राहणार आहे. नागरिकांनी कायदे पाळावेत, वाहन कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत आणि सुरक्षेच्या दृष्टीने हेल्मेट व सीटबेल्टचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या कारवाईचे नागरिकांतून मिश्र प्रतिक्रिया उमटत असल्या तरी अनेकांनी वाहतूक पोलिसांचे कौतुक करत अशा मोहिमांमुळे नियमबद्धता आणि शिस्त निर्माण होईल, असे मत व्यक्त केले आहे.

या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. बेलदार, पोलीस कर्मचारी श्री. लहाने, श्री. कांबळे, वाहतूक पोलीस शिवराज बांडे, श्री. शेरकर, श्री. धनवा, श्री. दहीफळे यांनी विविध वाहनांच्या तपासणी करीत कारवाई केली. या कारवाईमुळे अवैद्य वाहतूक तसेच कागदपत्र नसणाऱ्या वाहनाधारकांचे धाबे दणाणले आहेत.

# देहेन राखीव वन परिसरात स्वच्छता अभियान



**माणगाव : बातमीदार**

म्हसळा येथील देहेन वन रोपवाटिकेजवळील राखीव वन परिसरात वनविभागामार्फत स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे.

उपवनसंरक्षक शैलेंद्रकुमार जाधव, सहाय्यक उपवनसंरक्षक रोहित चौबे, आणि म्हसळा वनपरिक्षेत्र अधिकारी संजय पांढरकामे यांच्यासह भारत सरकारचे स्वच्छ भारत मिशन माणगावचे ब्रँड ॲम्बेसेडर शंतनु कुवेसकर, सहकारी उमेश देशमुख व म्हसळा वनविभागातील वनपाल आणि वनरक्षक यांची या अभियानास उपस्थिती होती.

वन परिसरातून गोळा केलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या, व इतर प्लास्टिक कचरा, मद्याच्या बाटल्या रिसायकलिंगसाठी देण्यात आल्या आहेत. हे अभियान कोणत्याही पूर्वनियोजनाविना वनपरिसराची पाहणी करत असताना वनाधिकाऱ्यांकडून राबवण्यात आले.

रायगड जिल्ह्यात पावसाळी निसर्ग पर्यटन तसेच समुद्रकिनारीदेखील उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटन होत असते. येथे येणारे पर्यटक येथे निसर्गाचा आनंद घेण्यासाठी येतात, परंतु जैवविविधतेने समृद्ध असलेल्या परिसरातून जात असताना रस्त्याशेजारी किंवा मग वन परिसरात वाहनातूनच किंवा प्रवासातून क्षणभर विश्रांतीसाठी थांबले असताना काही पर्यटकांकडून प्लास्टिकचा कचरा टाकला जातो. काही मद्यप्रेमी पर्यटकांकडून मद्याच्या बाटल्यादेखील टाकल्या जातात. पर्यटकांनी येथील पर्यावरण आणि सुंदर परिसरात कचरा होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे, असे आवाहन स्वच्छ भारत मिशनचे माणगावचे ब्रँड ॲम्बेसेडर शंतनु कुवेसकर यांनी केले आहे.

**रायगड जिल्ह्यात दक्षिणेकडील रोहा, माणगाव, तळा, महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन व मुरूड या आठ तालुक्यांचा समावेश रोहा वनविभागाचे कार्यक्षेत्रात होतो. या कार्यक्षेत्रातील वन परिसर जैवविविधतेने अतिशय समृद्ध व संवेदनशील असून येथील वनसंपदेला आपल्याकडून कोणत्याही प्रकारची हानी पोहचणार याची खबरदारी पर्यटकांकडून घेण्याचे अपेक्षित आहे. वनविभाग वन परिसरात स्वच्छता राखून येथील नैसर्गिक अधिवास अबाधित राखत वनसेवेसाठी तत्पर आहे.**

**–शैलेंद्रकुमार जाधव (भा.व.से.), उपवनसंरक्षक रोहा**

**वन परिसरात स्थानिक नागरिक अथवा पर्यटक कोणत्याही प्रकारचे अनुचित प्रकार तसेच कचरा टाकताना आढळून आल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात वनविभाग सक्षम आहे. नागरिकांनी वन परिसातून जात असताना व पर्यटन करत असताना जबाबदारीने वागावे. वनविभागाकडून योग्य त्या व शक्य तितक्या उपाययोजना केल्या जातील.**

**–रोहित चौबे, सहाय्यक उपवनसंरक्षक, रोहा**

# कर्जत येथील श्रीराम पुलावरील खड्डे भरले

**कर्जत : प्रतिनिधी**

मे महिन्यात जोरदार अवकाळी पाऊस पडला. त्यामुळे कर्जत–मुरबाड रस्त्यावरील रेल्वे पूल ते श्रीराम पुलादरम्यानचे खड्डे पडले होते. त्यानंतर आता जून महिन्यात मान्सूनने जोरदार सुरुवात केल्याने या भागात पुन्हा खड्डे पडले. हे खड्डे कर्जत शहर शिवसेनेच्या शिवसैनिकांनी भरले. त्यामुळे वाहतुकीत सुधारणा झाली.

रेल्वे पूल ते श्रीराम पूल या भागात नेहमीच खड्ड्यांचे साम्राज्य असते. त्यामुळे वाहनचालकांना वाहने चालवताना खड्डे चुकवावे लागतात. खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात छोटे–मोठे अपघात होतात तसेच वाहतुकीचीही कोंडी होते. मे महिन्यात पडलेल्या धुवाधार पावसामुळे या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले होते. हे खड्डे त्या वेळी माजी नगरसेवक संकेत भासे यांच्या माध्यमातून कर्जत शहर शिवसेनेच्या शिवसैनिकांनी भरले.



जून महिन्यात मान्सून सुरु झाला. सुरुवातीलाच मुसळधार पावसाने थैमान घातले. त्यामुळे रेल्वे पूल ते श्रीराम पुलादरम्यान पुन्हा खड्डे पडले. त्यामुळे वाहनचालकांना कसरत करून वाहने चालवावी लागत होती तसेच शाळा सुरु झाल्याने रिक्षा, स्कुल बस सुरु झाल्याने शहरात विद्यार्थ्यांना शाळेत ने–आण करणाऱ्या वाहनांची संख्या वाढली. हे लक्षात घेऊन शहर शिवसेनेने पुन्हा खड्डे भरण्याचा निर्णय घेतला.

माजी नगरसेवक संकेत भासे, शिवसेना शहर उपप्रमुख दिनेश कडू, संजय मोहिते, प्रदीप वायकर, भरत बामणे, दर्शन वायकर, विशाल बैलमारे आदींना पडलेले खड्डे भरण्यासाठी पुढाकार घेतला.

# प्रशिक्षक गंभीरकडून गोलंदाजांची पाठराखण



**लीड्स : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात दोन डावांत मिळून ८००हून अधिक धावा करुनही अखेरीस पराभव पत्करण्याची नामुष्की भारतीय संघावर ओढवली. भारतीय गोलंदाजीतील मर्यादा या सामन्यातून अधोरेखित झाल्या. जसप्रीत बुमरा वगळता सर्वच वेगवान गोलंदाजांवर टीका झाली, मात्र भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने गोलंदाजांची पाठराखण केली आहे. भारतीय गोलंदाजीत सध्या अनुभवाची कमतरता असून त्यांना पाठिंबा देणे, त्यांच्यावर विश्वास राखणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे गंभीर म्हणाला.

लीड्स येथे झालेल्या पहिल्या कसोटीत इंग्लंडने चौथ्या डावात ३७१ धावांचा यशस्वी पाठलाग केला. बुमराचा अपवाद वगळता भारतीय गोलंदाजांनी निराशा केली. प्रसिध कृष्णाने दोन डावांत मिळून पाच गडी बाद केले, पण त्याला धावांवर नियंत्रण राखता आले नाही. पहिल्या डावात २० षटकांत १२८ धावा, तर दुसऱ्या डावात १५ डावांत ९२ धावा त्याने धावा खर्ची केल्या. मोहम्मद सिराजने प्रयत्न केले, पण त्यालाही फारसे यश मिळाले नाही. शार्दूल ठाकूरही अचूक टप्पा राखण्यात अपयशी ठरला.

यावर गंभीर म्हणाला, पूर्वी ४०हून अधिक कसोटी सामने खेळलेले तीन-चार गोलंदाज संघात असायचे. आताचे चित्र वेगळे आहे. एकदिवसीय किंवा ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये अनुभव फारसा महत्त्वाचा ठरत नाही, मात्र कसोटी क्रिकेटमध्ये, तेही ऑस्ट्रेलिया, इंग्लंड किंवा दक्षिण आफ्रिकेत खेळताना अनुभव निर्णायक ठरू शकतो.

बहुतांश गोलंदाजांसाठी ही केवळ सुरुवात आहे. तुम्ही प्रत्येक सामन्यानंतर खेळाडूविषयीचे मत बदलण्यास सुरुवात केल्यास नव्या गोलंदाजांना घडवायचे कसे? बुमराह आणि सिराज वगळता आमच्या संघातील वेगवान गोलंदाजांना कसोटी क्रिकेटचा फारसा अनुभव नाही, पण त्यांच्यात क्षमता आणि गुणवत्ता नक्कीच आहे. त्यामुळेच ते ड्रेसिंग रुमचा भाग आहेत. त्यांच्यावर विश्वास दाखवणे, त्यांना पाठिंबा देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तुम्ही केवळ एका दौऱ्याचा विचार करू शकत नाही. आम्हाला असे वेगवान गोलंदाज तयार करायचे आहेत, जे येणाऱ्या वर्षांत भारताला सातत्याने कसोटी सामने जिंकवून देऊ शकतील, असे गंभीरने नमूद केले.

इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीतील अनुभवावरून खेळाडू यातून शिकतील आणि आगामी सामन्यांत कामगिरी उंचावतील अशी आशा आहे,' असेही गंभीर म्हणाला.

# पुन्हा एकदा भारत-पाक महामुकाबला

## वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्सचे वेळापत्रक जाहीर



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट चाहत्यांना पुन्हा एकदा भारत-पाक यांच्यातील महामुकाबला पहायला मिळणार आहे. वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स २०२५च्या दुसऱ्या हंगामातील वेळापत्रक निश्चित झाले आहे. १८ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत ही स्पर्धा खेळवण्यात येणार आहे.

या स्पर्धेत भारत-पाक यांच्यासह एकूण ६ संघ सहभागी होणार आहेत. गत हंगामात युवराज सिंगच्या नेतृत्वाखालील इंडिया चॅम्पियन्स संघाने पाकिस्तान चॅम्पियन्सला धोबीपछाड देत या स्पर्धेचे जेतेपद पटकावले होते. या दोन्ही संघात पुन्हा एकदा हायहोल्टेज सामना रंगल्याचे पहायला मिळेल.

इंडिया चॅम्पियन्स विरुद्ध पाकिस्तान चॅम्पियन्स या दोन संघातील साखळी फेरीतील लढत २० जुलैला बर्मिंघम येथील एजबेस्टनच्या स्टेडियमवर खेळवण्यात येणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार हा सामना दुपारी ४ वाजून ३० मिनिटांनी सुरू होईल. या सामन्यात युवराज सिंगच्या नेतृत्वाखालील संघातून सुरेश रैना, हरभजन सिंग आणि मोहम्मद कैफ हे दिग्गज मैदानात उतरणार आहेत. दुसरीकडे पाकिस्तानच्या ताफ्यात मिस्बाह उल हक, शाहिद आफ्रिदी, मोहम्मद आमिर आणि शोएब मलिक या खेळाडूंचा समावेश आहे.

# मी भरकटलो, चुकीच्या संगतीने घात झाला!

## पृथ्वी शॉची कबुली

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटचे भविष्य म्हणून एकेकाळी गौरवण्यात आलेला युवा फलंदाज पृथ्वी शॉ आज राष्ट्रीय संघाच्या निवडीच्या स्पर्धेतही नाही. रणजी करंडक स्पर्धेत मुंबईच्या अंतिम संघातून वगळल्यानंतर काही महिन्यांतच विजय हजारे करंडक स्पर्धेसाठी निवडलेल्या संघातही त्याला स्थान मिळाले नाही. अखेर आपल्या कारकिर्दीतील या खडतर टप्प्याबद्दल मौन सोडताना २५ वर्षीय शॉने आपण लक्ष्यापासून भरकटलो असल्याचे मान्य केले आहे.

शॉने २०१८मध्ये कसोटी पदार्पणातच १३४ धावांची खेळी केली होती. यानंतर तत्कालीन मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी शॉ हा सचिन तेंडुलकर, ब्रायन लारा आणि वीरेंद्र सेहवाग यांचा मिलाफ आहे, असे विधान करत कौतुकाचा वर्षाव केला होता.

गतवर्षी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२५च्या मेगा लिलावात शॉसाठी कोणीही बोली लावली नाही. तो अनसोल्ड राहिला. हंगाम सुरू झानंतर अनेक संघांमधील खेळाडू दुखापतग्रस्त असूनही कोणत्याही फ्रँचायझीने शॉला बदली खेळाडू म्हणूनही संघात स्थान दिले नाही.

या पार्श्वभूमीवर शॉ म्हणाला की, यामागे अनेक कारणे आहेत. लोकांना दिसणारे चित्र वेगळे आहे, कारण काय घडले हे मला माहीत आहे. मी ते समजू शकतो. मी आयुष्यात अनेक चुकीचे निर्णय घेतले आहेत. क्रिकेटला कमी वेळ देऊ लागलो. पूर्वी खूप सराव करायचो. नेटमध्ये तीन-चार तास फलंदाजी करायचो. फलंदाजीचा मला कधीच कंटाळा येत नसे. मी अर्धा दिवस मैदानावरच असायचो, पण माझे लक्ष विचलित झाले हे मी आता मान्य करतो.

मी अनावश्यक गोष्टींना आवश्यक मानू लागलो. मी काही चुकीचे मित्र बनवले, कारण त्या वेळी मी यशाच्या शिखरावर होतो. मग ते मला इकडे-तिकडे घेऊन जाऊ लागले. मग मी मार्गावरून भरकटलो. मी मैदानावर तीन तास सराव करायचो, आता तो चार तासांवर आला आहे, असे त्याने पुढे सांगितले.

माझ्या चुका मी मान्य करतो, पण माझा काळ कितीही वाईट असला, तरी माझ्या वडिलांनी मला नेहमीच पाठिंबा दिला आहे. त्यांनी चांगले आणि वाईट दोन्ही पाहिले आहे. आयपीएलच्या मेगा लिलावात कोणत्याही संघाने आपल्यासाठी बोली न लावल्याने मला धक्का बसला नाही, कारण मी त्यासाठी मानसिकदृष्ट्या तयार होतो, असेही पृथ्वी शॉ म्हणाला.



**'कौटुंबिक समस्याही होती'**

*नुकतेच दुसऱ्या राज्याकडून खेळण्यासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून (एमसीए) ना-हरकत प्रमाणपत्र मागणाऱ्या पृथ्वी शॉने आपल्याला कौटुंबिक समस्या असल्याचेही उघड केले आणि त्यामुळेही लक्ष विचलित झाले होते, असे त्याचे म्हणणे आहे. माझ्या आजोबांचे निधन झाले होते. ते मला खूप प्रिय होते. आजोबांच्या निधनानंतर एका कठीण काळातून गेलो. अशा अनेक गोष्टी आहेत, ज्या मी तुम्हाला सांगू शकत नाही, असे शॉ याने म्हटले आहे.*

# पंतला चांगल्या कामगिरीचा कसोटी क्रमवारीत फायदा



**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसीने कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. भारत आणि इंग्लंडच्या खेळाडूंनी पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात केलेल्या चांगल्या कामगिरीचा फायदा झाला आहे. ऋषभ पंत आणि बेन डकेट यांनी त्यांच्या कसोटी कारकिर्दीतील सर्वोत्तम रेटिंग मिळवले आहे. पंतने एका स्थानाने, तर डकेटने पाच स्थानांची मोठी झेप घेतली आहे.

भारताचा नवा कसोटी कर्णधार शुबमन गिलनेही पहिल्या डावात शतक झळकावले. त्याने पाच स्थानांची झेप घेतली असून तो २०व्या क्रमांकावर पोहचला आहे. ऑली पोपने तीन स्थानांची झेप घेत १९वे स्थान गाठले आहे.

लीड्स कसोटीच्या दोन्ही डावात उपकर्णधार ऋषभ पंतने शतक झळकावले. यानंतर आता तो ८०१ रेटिंग गुणांसह सातव्या स्थानावर पोहचला. बेन डकेटने पहिल्या डावात ६० धावा केल्या. दुसऱ्या डावात त्याने शतकी कामगिरी करत इतिहास लिहिला आहे. तो १३व्या स्थानावरून आठव्या स्थानावर पोहचला. त्याचे रेटिंग गुण ७८७ झाले आहेत.

इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूट हा जगातील नंबर वन कसोटी फलंदाज आहे, तर त्याचा सहकारी हॅरी ब्रुक दुसऱ्या क्रमांकावर आहे. केएल राहुललाही शतक झळकावण्याचा फायदा झाला आहे. त्याने १० स्थानांनी झेप घेतली असून तो ३८व्या क्रमांकावर पोहचला.

**गोलंदाजीत बुमराह अव्वल स्थानी कायम**

कसोटी गोलंदाजांच्या ताज्या क्रमवारीत कोणताही मोठा बदल झालेला नाही. भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने हेडिंग्ले कसोटीच्या पहिल्या डावात पाच विकेट्स घेतल्या आणि अव्वल स्थान कायम ठेवले. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत तीन स्थानांनी झेप घेत पाचव्या स्थानी पोहचला आहे.

# गोलंदाज हर्षित राणा मायदेशी परतणार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी भारतीय संघाने एक मोठा निर्णय घेतला असून वेगवान गोलंदाज हर्षित राणा याला मुख्य संघातून मुक्त (रिलीज) केले आहे. या मालिकेतील पुढील सामना २ जुलैपासून बर्मिंगहॅमच्या मैदानावर खेळला जाणार आहे.

इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी जेव्हा भारतीय संघाची घोषणा करण्यात आली, तेव्हा त्यात हर्षित राणाचे नाव नव्हते. राणा भारत-अ संघाचा भाग होता, जिथे त्याला इंग्लंड लायन्स संघाविरुद्धच्या दोन अनौपचारिक कसोटी सामन्यांच्या मालिकेत खेळायचे होते. या मालिकेनंतर खबरदारीचा उपाय म्हणून राणाला संघात दाखल करण्यात आले होते, तर उर्वरित खेळाडू मायदेशी परतले होते. आता लीड्स कसोटी सामना संपल्यानंतर संघ व्यवस्थापनाने हर्षित राणाला संघातून मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे तो आता मायदेशी परतणार आहे.

बीसीसीआयच्या एका सूत्राने नाव न सांगण्याच्या अटीवर वृत्तसंस्था पीटीआयला सांगितले की, हर्षित राणाला संघातून मुक्त करण्यात आले आहे. २ जुलैपासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटीसाठी तो भारतीय संघासोबत बर्मिंगहॅमला जाणार नाही.

# सूर्यकुमार यादववर लंडनमध्ये सर्जरी



**लंडन : वृत्तसंस्था**

भारताचा टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याच्यावर लंडनमध्ये शस्त्रक्रिया करण्यात आली. पोटाच्या खालच्या उजव्या बाजूला हार्नियाचा त्रास जाणवत होता. शस्त्रक्रियेनंतर त्याने मी पूर्णपणे ठीक असून लवकरच भारतात परत येणार असल्याची माहिती सोशल मीडियाद्वारे चाहत्यांना दिली.

सुर्यकुमारला गेल्या तीन महिन्यांपासून हार्नियाचा त्रास जाणवत होता. म्हणून त्याने मंगळवारी लंडनमध्ये जाऊन तेथील डॉक्टरांचा सल्ला घेतला. त्यानंतर त्याच्यावर बुधवारी हर्नियावर शस्त्रक्रिया करण्यात आली. याआधी जानेवारी २०२४मध्ये म्युनिकमध्ये त्याने अशीच सर्जरी केली होती, तर डिसेंबर २०२३मध्ये त्याच्या टाचेवरदेखील शस्त्रक्रिया करण्यात आली होती.

सूर्यकुमार २०२५च्या आयपीएलच्या सामन्यात शेवटचा खेळताना दिसला होता. आयपीएलच्या १६ सामन्यात त्याने ६५.१८च्या सरासरीने आणि १६७.९१च्या स्ट्राईक रेटने ७१७ धावा केल्या.

# रिंकू सिंहला युपी सरकारकडून मोठे गिफ्ट; अधिकारी म्हणून होणार नियुक्ती



**लखनऊ : वृत्तसंस्था**

भारताचा टी-२० मधील विस्फोटक फलंदाज रिंकू सिंहचा नुकताच साखरपुडा झाला. समाजवादी पक्षाची खासदार प्रिया सरोज आणि रिंकू लवकरच लग्नबंधनात अडकणार आहेत. यादरम्यान रिंकूसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. रिंकूला यूपी सरकारकडून मोठी भेट मिळाली आहे.

रिंकू सिंग आता यूपी सरकारमध्ये अधिकारी म्हणून त्याची नवीन इनिंग सुरू करणार आहे. रिंकूला क्रीडा कोट्यातून थेट सरकारी अधिकारी बनवले जात आहे. क्रीडा जगतात त्याच्या प्रशंसनीय कामगिरीबद्दल त्याला थेट भरती नियम २०२२ अंतर्गत मूलभूत शिक्षण अधिकारी पदावर नियुक्त करण्यात येणार आहे. या संदर्भात मूलभूत शिक्षण संचालकांनी एक पत्रही जारी केले आहे.

राज्य सरकारच्या धोरणानुसार रिंकू सिंहला शिक्षण संचालक म्हणून नियुक्ती देण्यात येत आहे, ज्या अंतर्गत खेळाडूंना सरकारी सेवांमध्ये सन्माननीय स्थान दिले जाते.

# नवी मुंबईच्या कृष्णा गोसावींनी द. आफ्रिकेतील मॅरेथॉन केली पूर्ण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील सानपाडा येथे राहणारे कृष्णा गोसावी यांनी दक्षिण आफ्रिकेच्या डोंगराळ भागातील चढ-उतारांनी भरलेली खडतर आणि सर्वात कठीण मानली जाणारी ९० किलोमीटर कॉम्रेडस मॅरेथॉन स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केली. १० तास ३२ मिनिटांत त्यांनी ही अंतर पार केले.

या स्पर्धेत जगभरातील २२ हजार ६८५ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यात गोसावी यांनी भारताकडून प्रतिनिधित्व करत ही स्पर्धा यशस्वी केली. संपूर्ण स्पर्धेत त्यांचा ८७२२वा क्रमांक, तर कॅटेगरीनुसार २४६८वा क्रमांक आला. शरीराची प्रचंड दमछाक करणारी मनुष्याचा कस बघणारी स्पर्धा म्हणून या मॅरेथॉनकडे पाहिले जाते.

अशा या स्पर्धेत कृष्णा गोसावी हे पुरुष गटात ७५६६व्या क्रमांकाने यशस्वी झाले व त्यांनी भारताचा झेंडा त्यांनी आफ्रिकेत फडकवला. त्यामुळे नवी मुंबईकरांचादेखील ऊर अभिमानाने भरून आला आहे. शिस्तीबद्ध नियमित सराव आणि एकाग्रता यामुळे मी ही मॅरेथॉन यशस्वी करू शकलो, असे गोसावी यांनी सांगितले.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com